RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://vidarbhaprajasattak.com

❑ वर्ष - १ ❑ अंक -२३९ ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.२४ नोव्हेंबर २०२३ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ...म्हणून पंकजाताईंचं मोठं नुकसान होतंय; चष्म्याच्या व्हिडिओवरून चर्चा रंगताच चंद्रकांत पाटलांची प्रतिक्रिया

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भाजप नेत्या आणि माजी मंत्री पंकजा मुंडे यांचे त्यांच्या पक्षात खच्चीकरण होत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात नेहमीच रंगत असते. त्यातच काही दिवसांपूर्वी पंकजा यांनी त्यांना चष्मा लागल्यानंतर सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या एका व्हिडिओने लक्ष वेधून घेतलं होतं. या पार्श्वभूमीवर भाजपचे नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.





पंकजाताई फक्त शिंकल्या तरी बातमी होते, त्या हसल्या तरी बातमी होते आणि कधी गंभीर झाल्या तरी बातमी होते. त्यामुळे पंकजा मुंडे यांचं दुर्दैव आहे की त्यांच्या प्रत्येक म्हणण्याचा काहीतरी वेगळा अर्थ काढला जातो. तुम्ही त्यांच्या बोलण्याचा चुकीचा अर्थ काढल्यामुळे त्यांचं मोठं नुकसान होत आहे, असं चंद्रकांत पाटलांनी म्हटलं आहे.

आपल्याला चष्मा लागला असल्याची माहिती पंकजा मुंडे यांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ पोस्ट करत दिली होती. याच व्हिडिओत त्यांनी उपरोधिकपणे भाष्य केल्याने सदर व्हिडिओ सर्वत्र चर्चा झाली. ताईला चष्मा लागला. लांबचा चष्मा नाही बरं का, हा जवळचा चष्मा आहे. मला जवळचं कमी दिसत होतं वाटतं. पण ते आता स्पष्ट दिसायला लागेल, असं पंकजा यांनी म्हटलं होतं. त्यामुळे त्यांच्या बोलण्याचा रोख नेमका कोणाकडे आहे, याबाबत तर्क-वितर्क लढवले जाऊ लागले आहेत.

### पंकजा मुंडे आणि भाजपमधील संघर्ष

राज्यात २०१४ साली भाजप सत्तेत आल्यापासून पंकजा मुंडे यांचा पक्षांतर्गत संघर्ष सुरू झाल्याचं बोललं गेलं. त्यांचे पंख छाटले जात असल्याची भावना मुंडे समर्थकांमध्ये तयार झाली आहे. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर पंकजा मुंडे यांना विधानपरिषदेवर घेतलं जाण्याची शक्यता होती. पक्षाकडून त्यांना तसं कळवलंही गेलं होतं. मात्र ऐनवेळी हा निर्णय बदलला गेला. तसंच पक्ष संघटनेत राज्य स्तरावर त्यांना कोणतीही मोठी जबाबदारी देण्यात आली नाही. त्यामुळे पंकजा मुंडे यांनी जाहीर व्यासपीठावरून अनेकदा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या आपली नाराजी बोलून दाखवली आहे.

## तर तुम्हाला भर चौकात जोड्याने मारेन; महाजनांवर टीका करताना खडसेंची जीभ घसरली

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

भाजपाचे नेते आणि मंत्री गिरीश महाजन आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार एकनाथ खडसे या दोघांमधून विस्तव देखील जात नाही. तसेच हे दोघेही एकमेकांवर आरोप प्रत्यारोप तसेच टीका करण्याची एकही संधी सोडत नाहीत.अशात काही दिवसांपूर्वी एकनाथ खडसे यांना हृदयविकाराचा त्रास झाला. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यासाठी तातडीने एअर अँब्युलन्सची व्यवस्था केली. मात्र एकनाथ खडसे यांच्या आजारपणावर गिरीश महाजन यांनी शंका उपस्थित केली होती. त्यानंतर आता यावर एकनाथ खडसे व्हिडीओ ट्वीट करत गिरीश महाजन यांना जोड्याने मारेन, असा इशारा दिला आहे.



एकनाथ खडसे व्हिडीओ ट्वीट करतना म्हणाले की, गिरीश महाजन यांनी माझ्या आजारावर प्रतिक्रिया दिली. मला नाटक करण्याची कधी गरज पडत नाही व तो माझा धंदाही नाही. मला वाटते त्यांचे वय साठ वर्षांचे होत आले आहे. त्यामुळे साठी आणि बुद्धी नाठी असे होत असल्यामुळे त्यांना काही सुचत नाही. त्यांना जर खात्री करायची असेल तर माझी कागदपत्रे तपासावीत. वैद्यकीय शिक्षण मंत्री असताना त्यांनी स्त्री रोगांकडे जास्त लक्ष दिले, त्यामुळे त्यांचे हृदयरोगांकडे कमी लक्ष गेले असेल. कार्डि टिक अरेस्ट काय असत ते देखील त्यांनी पाहून घ्यावा. माझे हृदय बंद पडले होते. बंद पडलेले हृदय सुरु करण्यासाठी डॉक्टरांना अथक परिश्रम करावे लागले. ७० ते ८० लाख लोकांमधून एखादा अशा अवस्थेतून परत येतो, तसा मी परत आलो आहे. कारण संत मुक्ताबाईंचे आणि अनेकांचे आशीर्वाद माझ्या पाठिशी होते. पण आता गिरीश महाजन यांना हे कसे काय कळणार? असा सवाल एकनाथ खडसे यांनी उपस्थित केला आहे.

गिरीश महाजन यांच्यावर आरोप करताना एकनाथ खडसे म्हणाले की, मेडिकल एज्युकेशन डिपार्टमेंटला त्यांनी चाळे केल्यामुळे त्यांची हकालपट्टी करण्यात आली. त्यामुळे माझे गिरीश महाजन यांना आव्हान आहे की, त्यांनी माझ्या सगळ्या कागदपत्रांची खातरजमा करावी.

## महाविकास आघाडी सरकारमुळे गोवारी समाजाच्या सवलती बंद; परिणय फुकेंचा आरोप

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

राज्यात भाजपचे सरकार असताना गोवारी समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती मिळाल्या. यासाठी अनेक वर्षांपासून संघर्ष सुरू आहे. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोवारी समाजाला सर्व सवलती दिल्या. आपणही आदिवासी विकास मंत्रिपदाच्या कार्यकाळात गोवारी समाजाला 'कास्ट व्हॅलिडिटी सर्टिफिकेट' मिळावे, अशी व्यवस्था केली. परंतु महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात जात प्रमाणपत्र असूनही गोवारी समाजाची शिष्यवृत्ती बंद केली गेली, असा थेट आरोप भाजप नेते व माजी मंत्री डॉ. परिणय फुके यांनी केला. आदिवासी गोवारी शहीद स्मृतिदिनानिमित्त नागपूर येथील झिरो माईल परिसरातील गोवारी स्मारक येथे जात डॉ. फुके यांनी अभिवादन केले. १९९४ साली नागपुरात सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनावेळी आपल्या न्याय्य हक्कांसाठी गोवारी समाजाने भव्य मोर्चा काढला होता. मात्र मोर्चावेळी पोलिसांनी लाठीमार केल्याने झालेल्या चेंगराचेरीत शेकडो समाज बंधू-भगिनींचा मृत्य झाला होता. त्यामुळे संघर्ष करताना शहीद झालेल्या सर्व गोवारी बांधवांना फुके यांनी आदरांजली वाहिली.



यावेळी डॉ. फुके म्हणाले, 'राज्यातील भाजप सरकारने दिलेल्या सवलतींमुळे आदिवासी गोवारी समाजातील युवक-युवती चांगले शिक्षण घेऊन उच्च पदापर्यंत पोहचले आहेत. उच्च न्यायालयातील लढाई यशस्वी झाल्यानंतर २०१८-१९ मध्ये गोवारी समाजबांधवांना शैक्षणिक अभ्यासक्रमातील सवलत सुरू झाली होती. परंतु महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर समाजाला देण्यात येणाऱ्या सवलती बंद केल्या गेल्या. हा आदिवासी गोवारी समाजावर मोठा अन्याय आहे. सर्वोच्च न्यायालयात महाविकास आघाडी सरकार समाजबांधवांची बाजू मांडण्यात अपयश ठरले. त्यामुळे गोवारी बांधवांना मिळणाऱ्या सवलती मिळणे बंद झाले आहे. सुप्रीम कोर्टातील हा लढा अजूनही सुरू असून, गोवारी बांधवांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठीच्या लढाईत आपण सदैव सोबत राहू, अशी ग्वाही फुके यांनी दिली.

यावेळी फुके म्हणाले, राज्यात भाजपचे शासन असले की सर्व जातीधर्माला न्याय मिळतो. मराठा समाजालाही भाजप सरकारने आरक्षण दिले होते. त्यापूर्वी राज्यातील आदिवासी गोवारी समजालाही सोयी, सवलती देण्यासाठी भाजप सरकारने एवढा पुढाकार घेतला. परंतु काही लोकांनी एवढा निष्काळजीपणा केला की जे दिले होते तेदेखील त्यांना कायम राखता आले नाही. मात्र आता राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आले आहे. त्यामुळे महायुती सरकारच्या काळात आम्ही पुन्हा आदिवासी गोवारी समाजासह सर्वांनाच पुन्हा न्याय देण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. आदिवासी गोवारी समाजाच्या समस्या आणि प्रश्नांची आपल्याला पूर्ण जाणीव आहे. आपण यासंदर्भात सरकारमधील नेत्यांकडे पाठपुरावा करणार आहोत, असे फुके म्हणाले. 'काळानुरूप आदिवासी गोवारी समाजाच्या समस्या आणि प्रश्न यात बदल झाला आहे. त्याकडेही आपले लक्ष आहे. समाजाला केवळ जात प्रमाणपत्र देण्यापुरते काम केले जाणार नाही, तर आदिवासी गोवारी समाजाचे अन्य प्रश्न, नोकरी, रोजगार आदी सर्व बाबींवर एकाचवेळी काम करणे गरजेचे आहे, याकडेही फुकेंनी लक्ष वेधले.

## शरद पवारांना अंधारात ठेवून त्यांनी शपथ घेतली सुप्रिया सुळेंची अजित पवार गटावर टीकास्त्र

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक पुणे**

लोकसभेत माझ्यासह अमोल कोल्हे, फैजल, श्रीनिवास पाटील आणि सुनील तटकरे असे आम्ही सदस्य आहोत. सुनील तटकरे यांच्यावर आम्ही पहिल्याच दिवशी अपात्रतेची कारवाई केली. अजित पवार यांच्या शपथविधीला त्यांनी पूर्ण ताकदीने समर्थन केले. अजित पवार गटाच्या मंत्र्यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना सांगितले आहे की, शरद पवार यांना अंधारात ठेवून आम्ही शपथ घेतली आहे. हे तुमच्या रेकॉर्डवर आहे. पक्षाच्या अध्यक्षाच्या माहिती नसताना एवढा मोठा निर्णय घेता तर अर्थात अपात्रतेची कारवाई व्हायला हवी, या मागणीचा पुनरुच्चार राष्ट्रवादी काँग्रेसशरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी केला आहे.



माध्यमांशी बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, भाजपसोबत आमची वैचारीक लढाई आहे. प्रफुल्ल पटेल त्यांच्या बाजूने निर्णय घेत असतील म्हणून आम्ही त्यांना जुलै महिन्यातच अपात्र केले आहे. केंद्र सरकार चुकीचे निर्णय घेतात तेव्हा प्रफुल्ल पटेल त्यांच्या बाजूने मतदानाचा निर्णय घेतात. त्यामुळे आम्ही त्यांच्याविरोधात अपात्रतेची पुन्हा मागणी केली आहे, अशी माहिती सुप्रिया सुळे यांनी दिली.

जिथे जिथे बलात्कार झाले, लोकांची घरे जाळली गेली, अशा अनेक गोष्टी झाल्या, त्याला आमचा पूर्ण विरोध आहे. या भारतात कुठल्याही महिलेचा बलात्कार होत असेल, जरी आम्ही सत्तेत असलो तरी जे चुकीचं आहे ते चुकीचे आहे. या चुकीच्या गोष्टींच्या बाजूने आम्ही मतदान करणार नाहीत. राजकारण असले तरी काही तत्वाच्या गोष्टी असतात. प्रफुल्ल पटेल यांची भूमिका पाहून आश्चर्य वाटले, दुःख झाले की, प्रफुल्ल पटेल यांनी भाजपला सहकार्य केले, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली.

दरम्यान, खासदार अमोल कोल्हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भेटले हे मला माहिती नाही. राज्यसभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे चार खासदार आहेत. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, वंदना ताई, फौजिया ताई आणि प्रफुल्ल पटेल हे आहेत. जेव्हा मणिपूरवर चर्चा झाली, मणिपूरमध्ये महिलांवर अत्याचार झाले, तेव्हा मतदानाची वेळ आली, किंवा चर्चेत भाग घ्यायची वेळ आली तेव्हा प्रफुल्ल पटेल यांनी भाजप, ज्यांची मणिपूरमध्ये सत्ता आहे, त्यांची बाजू घेतली याचे दुःख वाटले, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

## रोहित शर्मा, विराट कोहली टी २०मधून निवृत्ती घेणार?

**दि. २४ विदर्भ प्रजासत्ताक**

विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाकडून पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे भारतीय खेळाडूंप्रमाणेच तमाम भारतीय क्रिकेट चाहत्यांचा स्वप्नभंग झाला. मात्र, त्यानंतर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी २० मालिकेमधून विश्वचषक स्पर्धेच्या संघातील बहुतेक खेळाडूंनी ब्रेक घेतला आहे. त्यामुळे सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली तरुण खेळाडूंचा संघ या मालिकेत उतरवण्यात आला आहे. मात्र, विराट कोहली व रोहित शर्मा या भारताच्या दोघा स्टार खेळाडूंनी फक्त याच मालिकेतून ब्रेक घेतला नसून ते थेट टी २० क्रिकेटमधूनच निवृती घेणार असल्याची चर्चा रंगू लागली आहे. बीसीसीआयकडून पुढील वर्षी होणाऱ्या टी २० विश्वचषक स्पर्धेसाठी आत्तापासूनच संघ बांधणीवर काम करण्यात येत आहे. त्यासाठीच बीसीसीआयकडून या संघात तरुण खेळाडूंना संधी दिली जाणार असल्याचं बोललं जात आहे. त्यामुळेच या संघात विराट कोहली व रोहित शर्मा यांच्या समावेशाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे.




## छगन भुजबळांबाबत बच्चू कडू यांचे सूचक विधान म्हणाले - वरिष्ठांच्या सहमतीशिवाय ते आक्रमक

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

मराठा समाजाला ओबीसीतून सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या विरोधावरून जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात ओबीसी नेत्यांची महाएल्गार सभा मागील आठवड्यात १७ तारखेला पार पडली. या सभेच्या माध्यमातून सरकारमधील मंत्री आणि ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार निशाणा साधला. परंतु, यामुळे आता जरांगे पाटील आणि छगन भुजबळ यांच्यामध्ये नव्या वादाला सुरुवात झाली आहे. त्याशिवाय मराठा आणि ओबीसी हा वाद देखील आता यामुळे निर्माण होण्याची शक्यता आहे. छगन भुजबळ मराठा आरक्षणासंदर्भात वादग्रस्त वक्तव्य करत असताना मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री त्यांना आवर का घालत नाहीत असा प्रश्न निर्माण झाला आहे.



ओबीसींच्या महाएल्गार सभेनंतर संभाजीराजे छत्रपती यांनी छगन भुजबळ यांची मंत्रिपदावरून हकालपट्टी करण्यात यावी, याबाबतची मागणी केली आहे. छगन भुजबळ यांच्यामुळे मराठा वि. ओबीसी असा वाद पेटत असल्याचा आरोप राजकीय वर्तुळातून करण्यात येत आहे. मात्र, भुजबळांकडून करण्यात येणाऱ्या या विधानांबाबत आता प्रहार जनशक्ती संघटनेचे आमदार बच्चू कडू यांच्याकडून सूचक विधान करण्यात आले आहे. वरिष्ठांच्या सहमतीशिवाय भुजबळ अशाप्रकारे आक्रमक बोलणार नाहीत, असे मत बच्चू कडू यांच्याकडून व्यक्त करण्यात आले आहे.

## मेहुण्यासाठी काहीपण करणाऱ्या सदावर्तेंना मोठा धक्का; रोष व्यक्त करून १४ संचालक नॉट रिचेबल

**दि. २४ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

या ना त्या कारणाने चर्चेत राहाणारे गुणरत्न सदावर्तेंना मोठा धक्का बसला आहे. कारण, काहीच दिवसांपूर्वी एसटी कर्मचारी बँकेच्या निवडणुकीत निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून मर्जीतील कार्यकर्त्यांना निवडून आणले, त्या संचालकांनीच सदावर्ते यांना मोठा धक्का दिलाय. सदावर्ते यांच्या कार्यशैलीवर रोष व्यक्त करून १९ पैकी १४ संचालकांनी त्यांच्या विरोधात भूमिका घेऊन संपर्क क्षेत्राच्या बाहेर गेले आहेत. तेव्हा गुणरत्न सदावर्ते यांना मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपाला पाठिंबा देत गुणरत्न सदावर्ते यांनी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारला घेरलं होतं. त्यानंतर सत्तांतर झाल्यानंतर आता शिंदे-फडणवीस सरकारच्या काळातही ते कधी मराठा समाजा विरोधात घेतल असलेल्या भूमिकांमुळेही ते काहीसे चर्चेत राहत आहेत. त्याचमुळे आता गुणरत्न सदावर्ते आपल्या वक्तव्यांच्या माध्यमातून समाजात द्वेष पसरवत आहेत. सामान्य गरीब एसटी कर्मचाऱ्यांचा केवळ राजकारणासाठी उपयोग करत असल्याचा आरोप या चौदा संचालकांनी करत त्यांच्यावर नाराजी व्यक्त केली.



### बैठकीनंतर १४ संचालक आऊट ऑफ कव्हरेज

एसटी महामंडळाच्या गुरुवारी झालेल्या १९ पैकी १४ संचालकांनी दांडी मारून सर्वजण संपर्क क्षेत्राच्या बाहेर गेले. संचालक मंडळाच्या बैठकीला केवळ पाच संचालक उपस्थित राहिले होते. एसटी कर्मचारी सहकारी बँकेत एकतर्फी सत्ता मिळवल्यानंतर सदावर्तेंनी त्यांचे मेहुण्याला व्यवस्थापकीय संचालकपदावर बसविले. बँकिंग क्षेत्रातील काडीचा अनुभव नसतानाही इतक्या मोठ्या पदावर त्यांना बसवल्यानंतर बँकेचे संचालकांमध्ये सदावर्तेंवर रोष होता. याच रोषाला आता त्याना सामोरे जावे लागत आहे.

## संपादकीय ......

# वर्ल्डकपचे कवित्व

*यंदा भारतात आयोजित करण्यात आलेल्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाने विक्रमांचे पूल बांधले. प्रत्येक खेळाडूची कामगिरी नेत्रदीपक झाली. या स्पर्धेचा अंतिम सामना रविवारी अहमदाबादेत झाला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताविरोधात सहज विजय मिळविला. सलग १० सामने जिंकणार्या भारताला शेवटच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने पराभूत करत विश्वचषक २०२३ स्वतःच्या नावे केला. यामुळे १४० कोटी भारतीयांची मने दुखावली गेली. भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माला अश्रू आवरता आले नाहीत, पण येथूनच राजकीय टोलेबाजीला सुरुवात झाली. काही हास्यास्पद आरोप-प्रत्यारोप करण्यात येत आहेत. अंतिम सामना होऊन तीन दिवस झाले तरी अजून त्याचे कवित्व संपलेले नाही. या अंतिम सामन्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते, पण भारताला या विश्वविजेतेपदाचा पहिला बहुमान मिळवून देणारे भारतीय संघाचे माजी कर्णधार कपिल देव तसेच दुसर्यांदा विश्वचषक जिंकणार्या भारतीय संघाचे नेतृत्व करणारे माजी कर्णधार एम. एस. धोनी यांना निमंत्रित केले गेले नसल्याचे सांगण्यात येते. दस्तुरखुद्द कपिल देव यांनीच ही माहिती दिली आहे. १९८३ साली पहिल्यांदा विश्वचषक जिंकणार्या आपल्या नेतृत्वाखालील भारतीय संघाला या सामन्यासाठी निमंत्रित केले जाईल, अशी त्यांची अपेक्षा होती, पण भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने तेवढा मोठेपणा दाखवला नाही, असेच म्हणावे लागेल.*

*वास्तवात अनुकूल परिस्थिती नसतानाही शानदार खेळ करत तमाम भारतीयांची मान उंचावणारी कामगिरी करणार्यांचा विसर कसा पडू शकतो, हाच खरा प्रश्न आहे. त्यातही विसर पडला की जाणूनबुजून डावलले गेले? या अशाच कारणामुळे विरोधकांच्या हाती आयते कोलित मिळाले. यावरदेखील राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न झाला. विरोधकांनी त्याचे भांडवल केले असले तरी देशातील दिग्गज खेळाडूंसह 'पुरस्कार वापसीसाठी' तत्पर असलेल्या मान्यवरांनीदेखील याबाबत मौन बाळगले आहे, हे अतिशय खेदजनक आहे. याशिवाय राजकीय स्तरावर विविध आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत ते वेगळेच. पहिला आक्षेप घेतला गेला तो अंतिम सामना खेळवण्यात आलेल्या स्टेडियमबद्दल. हा सामना अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये खेळवण्यात आला होता, पण तो मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर का खेळवला गेला नाही? इतकेच काय, ईडन गार्डन का नाही, असे प्रश्न उपस्थित करण्यात आले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने याची तुलना थेट महाराष्ट्रातील उद्योगांशी केली. राज्यातील उद्योग ज्याप्रकारे गुजरातमध्ये पळविले जात आहेत, त्याप्रमाणे विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामनादेखील गुजरातमध्ये नेण्यात आला, अशी टीका ठाकरे गटासह काही विरोधकांनी केली आहे. मुळात विश्वचषक स्पर्धेचे पहिले वेळापत्रक २७ जून २०२३ रोजी, तर सुधारित वेळापत्रक ९ ऑगस्ट २०२३ रोजी जारी करण्यात आले. या दोन्ही वेळापत्रकांमध्ये अंतिम सामना १९ नोव्हेंबर २०२३ रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार असल्याचे स्पष्ट झाले होते. मग तेव्हा आक्षेप घेतला गेला नाही हे विशेष!*

*आता या स्पर्धेला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह काही केंद्रीय मंत्री, भाजपचे नेते, बॉलिवूड तारे-तारका उपस्थित होते, पण या सामन्यातील भारताच्या पराभवाला काही नेटकर्यांनी नरेंद्र मोदी स्टेडियम आणि पंतप्रधान मोदी यांना जबाबदार ठरवले आहे. पंतप्रधान स्टेडियममध्ये जाण्याआधी भारताला ऑस्ट्रेलियाचे तीन गडी एका पाठोपाठ एक बाद करण्यात यश आले होते, पण पंतप्रधान स्टेडियममध्ये दाखल झाल्यानंतर एकही खेळाडू बाद झाला नसल्याची टिप्पणी सोशल मीडियावर फिरू लागली. हाच धागा पकडत काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे थेट नाव न घेता 'पनौती' असे म्हटले आहे. राजस्थानच्या जयपूरमधील जालोर येथे प्रचार सभेत राहुल गांधी यांचे भाषण सुरू होताच जमलेल्या समुदायाने 'पनौती पनौती' अशा घोषणा द्यायला सुरुवात केली. त्यावर राहुल गांधी म्हणाले की, 'बरे-वाईट काही का असेना, आपली टीम जिंकली असती; पण पनौतीने पराभूत केले.'*

# ग्राहकांसाठी ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीसाठी

# महावितरणच्या ॲपवर सुविधा

**दि.२३विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** ट्रान्सफॉर्मर जळाला अथवा बिघडल्यास तातडीने दुरुस्त ट्रान्सफॉर्मर त्या जागी बसविण्यासाठी वीज ग्राहकांनी महावितरणच्या पचा वापर करून खबर द्यावी, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.ट्रान्सफॉर्मर जळाल्यास अथवा बिघडल्यास त्या जागी लवकरात लवकर दुरुस्त ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार महावितरणने राज्यभर मोहीम सुरू केली आहे.

यामुळे खबर मिळाल्यानंतर कमाल तीन दिवसात बिघडलेला ट्रान्सफॉर्मर बदलला जात आहे. तथापि, नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरबद्दल माहिती मिळण्यास विलंब होत असल्याने ग्राहकांनी मदत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यासाठी महावितरणच्या मोबाईल पवरील सुविधा वापरणे ग्राहकांसाठी सोपे ठरू शकते.जळालेल्या ट्रान्सफॉर्मरच्या जागी दुरुस्त ट्रान्सफॉर्मर बसविण्यास विलंब होण्याची समस्या सोडविण्यासाठी महावितरणने ट्रान्सफॉर्मर ऑईल तातडीने उपलब्ध करणे,

दुरुस्त ट्रान्सफॉर्मरचा साठा तयार करणे असे विविध उपाय केले आहेत. ट्रान्सफॉर्मर बदलणे व दुरुस्त करणे याचा आढावा मुख्यालय स्तरावर दररोज घेण्यात येतो.

या मोहिमेला यश आले असून महावितरणला ट्रान्सफॉर्मर बिघडल्याची खबर मिळाल्यानंतर कमाल तीन दिवसात ट्रान्सफॉर्मर बदलण्यात येत आहे. तथापि, ट्रान्सफॉर्मर जळाला आहे, हेच उशीराने समजले तर प्रत्यक्षात वीज पुरवठा पुन्हा सुरू होण्यास अधिक विलंब लागत असल्याची समस्या जाणवत आहे.



### ॲपवरून तक्रार अशी करा –

मोबाईलवर महावितरण हे ॲप उघडा नादुरुस्त रोहित्राची माहिती कळवा या बटणावर क्लिक कराग्राहकाचे नाव नंबर दिसेल त्यावर क्लिक करा आपले कनेक्शन ज्या ट्रान्सफॉर्मरला जोडलेले आहे, त्याचा नंबर, गाव, तालुका व जिल्हा याची माहिती भरलेली दसेल.ट्रान्सफॉर्मरजवळचीखूण कोणती आहे, कधीपासून ट्रान्सफॉर्मर बंद आहे आणि कोणता बिघाड दिसतो याची माहिती भरासंबंधीत ट्रान्सफॉर्मरचा फोटो काढून अपलोड करानोंद करा किंवा सबमिट हे बटण दाबाट्रान्सफॉर्मरची तक्रार नोंदविली जाईल. त्याची नोंद थेट महावितरणच्या मुख्य सर्वरमध्ये होईल. ातडीने दुरुस्त ट्रान्सफॉर्मर सविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सएमएसद्वारे सूचना दिली जाईल.ट्रान्सफॉर्मर बदलला की, त्याची माहिती ग्राहकाला एसएमएसद्वारे दिली जाईल.

# विभागीय आयुक्त निधी पाण्डेय यांची मतदार यादी निरीक्षक पदी नियुक्ती

## २५ नोव्हेंबरला अमरावती जिल्ह्याला देणार भेट

**दि२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** विशेष पुनरिक्षण कार्यक्रमासाठी महसुल विभागातील मतदार यादी निरीक्षक म्हणून विभागीय आयुक्त निधी पाण्डेय यांची नियुक्ती केली आहे. कार्यक्रमांतर्गत अमरावती जिल्ह्याला शनिवार दि. २५ नोव्हेंबर रोजी विभागीय आयुक्त भेट देणार असून राजकीय पक्षाशी चर्चा करणार आहे, अशी माहिती उप जिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी दिली.निवडणूक आयोगाने दि. १ जानेवारी २०२४ अर्हता दिनांकावर मतदार यादीचा विशेष पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. कार्यक्रमांतर्गत मतदार यादी निरीक्षक विभागीय आयुक्त अमरावती, अकोला, वाशीम, यवतमाळ व बुलडाणा या जिल्ह्यांना तीन भेटी देणार आहेत. प्रथम भेटीचा कार्यक्रम दि. २७ ऑक्टोबर ते ९ डिसेंबर या कालावधीत निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार अमरावती जिल्ह्यात दि. २५ नोव्हेंबर रोजी भेट देणार आहेत. अमरावती जिल्ह्याकरीता समन्वय अधिकारी म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख प्रशिक्षण व



विकास प्रबोधिनीचे संचालक अजय लहाने काम पाहतील. भेटीदरम्यान जिल्ह्यातील सर्व खासदार, आमदार व राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीशी चर्चा करणार आहे. यामध्ये मतदार यादीतील नोंदीबाबत आक्षेप व इतर तक्रारीबाबत चर्चा करण्यात येणार आहे. त्यानंतर शहरातील मतदार केंद्रावर भेटी देवून मतदार केंद्राची पाहणी करणार येणार आहे, अशी माहिती उप जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी दिली.

# चांदूररेल्वे शहरातून निघाला पीरसाहेब बाबांचा कौमी एकता शाहीसंदल

## दर्ग्यावर चादर केली अर्पण, जगात सुख-शांती नांदावी यासाठी केली प्रार्थना

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** तालुक्यातील तरोडा येथील हजरत सैयद जलालुद्दीन शाह उर्फ पीरसाहेब बाबा यांचा कौमी एकता शाहीसंदल बुधवारी चांदूररेल्वे शहरातून मोठ्या थाटामाटात काढण्यात आला. यावेळी दर्यावर चादर चढविण्यात आली.

गतवर्षीप्रमाणे याहीवर्षी चांदूररेल्वे तालुक्यातील तरोडा येथील हजरत सैयद जलालुद्दीन शाह उर्फ पीरसाहेब बाबा यांचा शाही संदल चांदूररेल्वे शहरातील काझीपुरा येथील शेख नजीरभाई (घोडेवाले) यांच्या घराजवळून काढण्यात आल्या. या संदल मिरवणुकीत विशेषतः लहान मुले आणि तरुणांनी ढोलताशांच्या तालावर फेर धरला होता. तसेच रॅलीत झालेल्या कव्वालीने लोक मंत्रमुग्ध झाले. ही संदल रॅली सिनेमा चौक, जुना मोटार स्टँड, अमरावती रोड या प्रमुख रस्त्यांवरून पुढे तरोडा येथील पीर साहेब बाबांच्या दर्यावर पोहचली. दर्यात चादर अर्पण केल्यानंतर संपूर्ण जगात सुख, शांती नांदावी यासाठी प्रार्थना





करण्यात आली.

यादरम्यान माजी आमदार अरुण अडसड, भाजप नेते रावसाहेब रोठे, माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप, वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष नीलेश विश्वकर्मा, न.प.चे माजी सभापती सचिन जयस्वाल व इतर अनेकांचायात सहभाग होता. संदल मिरवणुकीत काँग्रेस कमिटीतर्फे पाणी वाटप करण्यात आले. संदलनंतर दर्यावर कव्वाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. संदल मिरवणुकीत सर्व धर्मीय नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाकरिता आयोजन समितीने परिश्रम घेतले.-




## नाश्त्यात 'या' गोष्टी कधीही खाऊ नका, तुमचा दिवस खराब होईल...

डोनट, केक यासारखे गोड पदार्थ सकाळच्या नाश्त्यात घेऊ नयेत. ते कॅलरी आणि शुद्ध कर्बोदकांमधे समृद्ध असतात ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वेगाने कमी होऊ शकते.

रक्तातील साखरेची पातळी वेगाने कमी झाल्यास तुम्हला अशक्त आणि थकल्यासारखे वाटू शकते. त्यामुळे नाश्त्यात गोड पदार्थ घेण्याऐवजी फळे, दही, अंडी इत्यादी आरोग्यदायी पदार्थांचे सेवन करावे. हे तुम्हाला दीर्घकाळ ऊर्जा देणाया मदत करतील.



आजच्या व्यस्त जीवनात, जेव्हा आपल्याकडे वेळ कमी असतो, तेव्हा अनेक वेळा आपण आपल्या आहाराकडे दुर्लक्ष करतो. आपल्या व्यस्त वेळापत्रकामुळे आपल्यापैकी बहुतेकांना नाश्ता अजिबात करता येत नाही आणि जरी केला तरी तो नीट करता येत नाही. पण, सकाळचा नाश्ता शरीर खूप महत्त्वाचा असतो.

संतुलित आणि पौष्टिक नाश्ता आपल्याला दिवसभर उत्साही आणि सक्रिय ठेवण्यास मदत करतो. त्यामुळे आपली विचार करण्याची क्षमता वाढते आणि तणाव कमी होण्यासही मदत होते. तसेच तुम्ही कितीही व्यस्त असलात तरी नाश्त्याकडे कधीही दुर्लक्ष करू नये. जाणून घ्या असे कोणते पदार्थ आहेत जे नाश्त्यात खाऊ नये.

सकाळी झोपेतून उठल्यानंतर आपले शरीर थकले आणि सुस्त असते. यावेळी तळलेले अन्न जसे की पराठे, पुरी इत्यादी पचण्यास त्रास होऊ शकतो. यामुळे आपल्या पचनसंस्थेवर दबाव येऊ शकतो आणि पोटाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे लापशी, पोहे, फळे इत्यादी निरोगी आणि हलका नाश्ता करणे चांगले. हे पदार्थ सकाळी सहज पचतात आणि आपल्याला दिवसभर निरोगी राहण्यास मदत होते.

सकाळी उठल्यानंतर, बऱ्याच लोकांना चहा किंवा कॉफी घेण्याची सवय असते. अनेकांचे असे म्हणणे आहे की त्यामुळे ताजे आणि उत्साही वाटते. पण, तुम्हाला माहित आहे का? की जास्त प्रमाणात चहा-कॉफी पिणे आपल्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते? वास्तविक, चहा आणि कॉफीमध्ये कॅफिन नावाचे घटक असतात.

नाश्ता हे आपल्यासाठी सर्वात महत्वाचे जेवण आहे. कारण ते आपल्याला दिवसभर ऊर्जा देते. पण, काही लोक नाश्त्यात फास्ट फूड खातात. जे आरोग्यासाठी चांगले नाहीये.

पिझ्झा, बर्गर, सँडविच, नूडल्स या सारख्या पदार्थांमध्ये मीठ आणि कॅलरी जास्त प्रमाणात आढळतात. सकाळी असे जड अन्न खाल्ल्याने आपल्या पचनक्रियेवर परिणाम होऊ शकतो. यामुळे पचनाच्या समस्याही उद्भवू शकतात

# नितीन कदम यांच्या पाठपुरावा व मागणीला अखेर यश !

# भातकुली तालुका अखेर शासकीय मदतयादीत समाविष्ट ..

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपदेसोबतच रानटी जनावरे, त्यात बाजारपेठेत त्यांची होणारी अवहेलना व इतर विविध समस्येमुळे आधीच शेतकरी व्याकूळ झाला आहे.त्यामध्ये आता शासनाच्या 'मुघली फर्मान' मध्ये झालेल्या नुकसांनासंदर्भात अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुका वगळण्यात आला होता.येथील शेतकऱ्यांच इतर तालुक्यातील शेतकाऱ्यांच्या तुलनेत अति जास्त अतोनात प्रमाणात नुकसान दिसून येत होते. परंतु स्थानिक प्रशासन याबाबद उदासीन दिसून येत होते. मात्र समाजसेवी नितीन कदम यांच्या सततच्या पाठचपुराव्यामुळे प्रशासन खळबळून जागे झाले.नितीन कदम यांनी उपोरोक्त निवेदनात स्थानिक शेतकरी वर्गावर नुकसाभरपाईची मदत



निधी बाबाद कश्या प्रमाणात अन्यायकारक भूमिका शासन घेत आहे याची जाणीव करून देत आपले निवेदन सादर केले होते.याच त्यांच्या निवेदन वेळी भातकुली तालुक्यातील शेकडो शेतकरी वर्गाचा समूह घेऊन प्रशासन दरबारी पोहोचले होते. संतप्त जमावाने कायदेशीररित्या कदम यांच्या नेतृत्वात सदर मांगण्याच निराकरण केल्याचे चिन्ह आता शासनाकडून दिसून येत आहे.. नितीन कदम यांच्या पाठ्यपुराव्यानंतर सुधारित आढावा जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार तालुकानिहाय सर्वेक्षणात भातकुली तालुक्याला २.२५ कोटी नुकसानग्रस्त धारकांना मदत प्रशासनाने जाहीर केली आहे. अपेक्षानीरास झालेल्या शेतकरी सदर मदतीमुळे भारावून गेला आहे.नितीन कदम यांनी शेतकऱ्यांनाच्या प्रश्नासाठी उचलेल्या कार्याची प्रशासनाने दखल घेतल्याने शेतकरी कदम यांचे कौतुक करीत आहे.

दै.विदर्भ प्रजासत्ताक अंक नि:शुल्क पाहिजे असल्यास आम्हाला तुमच्या नावासह टेक्स मेसेज किंवा व्हाट्सअप करा आमचा मो.नंबर ८६२४९८५६३३ संपर्क करा.

# २९ वर्षांत आदिवासी गोवारींची झोळी रिकामीच

## चार पिढ्या आरक्षणासाठी गारद, राष्ट्रपतींना साकडे

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**



स्वातंत्र्यपूर्व काळापासून आदिवासींमध्ये समाविष्ट असताना शासनाचे चुकीचे अध्यादेश व त्यात राजकीय अनास्थेसोबतच लालफीतशाहीच्या खेळात ११४ आदिवासी गोवारींचा बळी गेला. एका न्यायालयाने आदिवासी ठरविले, मात्र सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा वेगळा निर्णय दिल्याने आता राज्यातील आदिवासी गोवारी बांधवांनी राष्ट्रपतींना साकडे घातले आहे.

आदिवासी गोवारी समाज हा विदर्भात मोठ्या संख्येने आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून या जमातीला आदिवासींच्या सवलती मिळत असताना १५ एप्रिल १९९५ रोजी शासनाने आदेश काढून गोवारी जमातीला सवलतीपासून वंचित ठेवले. यादरम्यान २३ नोव्हेंबर १९९४ रोजी नागपूर हिवाळी अधिवेशनावर काढलेल्या मोर्चात ११४ निष्पाप गोवारींचा बळी गेला. तद्नंतर या जमातीला आदिवासींच्या सवलतींपासून वंचित ठेवत विशेष मागास प्रवर्गाच्या सवलती देण्यात आल्या. मात्र, या जमातीला सवलतीचा लाभ झाला नाही.

> राज्यातील आदिवासी आमदार आमच्या मतांवर निवडून येतात. मात्र, आम्हा आदिवासींना विरोध करतात. आता राष्ट्रपती भवनासमोर बेमुदत उपोषणाला बसण्याचा आमचा निर्धार आहे.
>
> – **कृष्णा चौधरी,** नेते, आदिवासी गोवारी युवा शक्ती संघ, अमरावती.

आदिवासी गोवारी हे आदिवासी असल्याचा निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने १४ ऑगस्ट २०१८ मध्ये दिला. ही जमात समाज प्रवाहात येत असताना राज्य शासनाच्या आदिवासी विभागाने उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सर्वोच्च न्यायालयाने ही जमात गोवारी आदिवासी नसल्याचा निर्वाळा दिला. त्यामुळे गोवारी जमात पुन्हा वंचित झाली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात पॅरा क्र. ८३ वर ' गोंड गोवारी कोण...?' याचे वर्णन केले आहे. या परिच्छेदमध्ये गोंड गोवारी लोक म्हणजे गोंडाची उपजमात. जे गोवारी लोक आहेत, तेच गोंड गोवारी होय. हे गोंड गोवारी लोक अमरावती, भंडारा, गडचिरोली जिल्ह्यात राहतात, असे म्हटले आहे. गोंडाची उपजमात गोवारी म्हणजे गोंड गोवारी लोक आम्हीच आहोत. त्यामुळे आमच्या न्याय हक्काची लढाई आम्ही लढू, असे आदिवासी गोंड गोवारी शहीद स्मारक (चांदूर रेल्वे) चे अध्यक्ष किशोर भोयर यांनी सांगितले.

आमची आदिवासी संस्कृती आहे, हे आम्ही न्यायालयाला सिद्ध करून दाखविले. सवलतींसाठी चार पिढ्या गारद झाल्या. यात राजकारण आडवे येते आणि आम्हाला वंचित ठेवले जाते. त्यामुळे थेट राष्ट्रपती भवनासमोर उपोषणाचा इशारा या जमातीतील युवा कार्यकर्त्यांनी दिला आहे.

## शिक्षक समिती अमरावती ची DCPS/NPS जिल्हा कार्यकारणी घोषित

# जिल्हाध्यक्ष आल्हाद तराळ,जिल्हा,सरचिटणीस प्रेमसिंग ठोंबरे,जिल्हा कार्याध्यक्ष निलेश कांडलकर,कोषाध्यक्ष पंकज दहिकर यांची नियुक्ती

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–**



महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती महाराष्ट्र राज्य ची राज्य कार्यकारणी सभा तुळजापूर जि.उस्मानाबाद येथे पार पडली. १ नोव्हेंबर २००५ सेवेत आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना१९८२-८४ ची जुनी पेंशन योजना लागू व्हावी या उद्देशाने जुनी पेंशन मागणीचा लढा अधिक तीव्र याकरिता महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती महाराष्ट्र राज्याची DCPS/NPS आघाडी तयार करण्यात आली. राज्य कार्यकारिणी सूचनेनुसार महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जि.अमरावती ची ऊउझड/छझड ची जिल्हा कार्यकारणी गोकुलदासजी राऊत सर (जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती,अमरावती)यांच्या नेतृत्वाखाली घोषित करण्यात आली. नवनियुक्त कार्यकारणी मध्ये आल्हाद तराळ यांची जिल्हाध्यक्ष ,प्रेमसुख ठोंबरे यांची जिल्हा सरचिटणीस, निलेश कांडलकर यांची जिल्हा कार्याध्यक्ष तर पंकज दहिकर यांची जिल्हा कोषाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. यावेळी गोकुलदास राऊत सर (जिल्हाध्यक्ष) संभाजी रेवाळे सर (जिल्हा सरचिटणीस),राजेश सावरकर सर (राज्य प्रसिद्धी प्रमुख),अजय पवार सर (तालुकाध्यक्ष अचलपूर तथा संचालक शिक्षक बँक),मनिष काळे सर (संचालक शिक्षक बँक)इमरान पठाण सर,शैलेंद्र स.दहातोंडे (जिल्हा प्रसिद्धी प्रमुख)उपस्थिती होते.

# अमरावती पालकमंत्री ना श्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते हाफ मॅरेथॉन स्पर्धेच्या वेब साईट व प्रोमो चे उद्घाटन

## २५ डिसेंबर रोजी गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व अमरावती जिल्हा अथलेटिक्स संघटनाचे आयोजन

**दि. विदर्भ प्रजासत्ताकअमरावती**

भारताचे माजी प्रधानमंत्री भारतरत्न स्वर्गवासी अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्याने गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व अमरावती जिल्हा थलेटिक्स संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने २५ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी सहा वाजता राज्यस्तरीय हा मॅरेथॉन अटल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे वेबसाईट व प्रोमोचे उद्घाटन अमरावती



जिल्ह्याचे पालकमंत्री श्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते व आ प्रवीण पोटे , खा अनिल बोंडे , आ प्रताप अडसड व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत दिनांक २४ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ९ वाजता अमरावती विश्रामगृह येथे होणार आहे. याप्रसंगी अमरावतीच्या क्रीडा प्रेमींनी उपस्थित रहावे , असे आव्हान गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा आयोजक भाजपा नेते तुषार भारतीय यांनी केले आहे.

# अमोल चवणे यांना सामाजिक क्षेत्रातील राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

## ३ डिसेंबर ला दिल्ली येथे होणार सन्मान

**डॉ.आंबेडकर ग्लोबल फाउंडेशनचे आयोजन**

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – विविध संघटनांच्या माध्यमातून सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे शहरील नामवंत युवा उद्योजक अमोल चवणे यांना यावर्षीचा सामाजिक क्षेत्रातील राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला असून येत्या ३ डिसेंबर रोजी दिल्ली येथील संविधान भवन येथे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. आंबेडकर ग्लोबल फाउंडेशन यांच्या वतीने हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येणार असून दिग्गज मान्यवरांची या सोहळ्याला उपस्थिती राहणार आहे. अमोल चवणे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत.रोटरी क्लब ऑफ अमरावती अंबिका तसेच सहयोग फाउंडेशन अमरावती या संस्थांच्या माध्यमातून अनेक रुग्ण तसेच गोरगरीब कुटुंबांना



आधार देण्याचे काम अमोल चवणे निरंतर करत आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत दिल्ली येथील डॉ. आंबेडकर ग्लोबल फाउंडेशनने त्यांना सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानासाठी राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केलेला आहे. या आधी सुद्धा गोवा सरकारने त्यांचा उद्योग भूषण पुरस्काराने गौरव करण्यात आलेला आहे. ३ नोव्हेंबर रोजी दिल्ली येथील संविधान भवन येथे अमोल चवणे यांना राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. या सन्मान सोहळ्याला मुख्य अतिथी म्हणून सामाजिक न्याय मंत्री मंत्री रामदास आठवले, केंद्रीय विधी व न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल, आदीला फाउंडेशन चे अध्यक्ष डॉ. एस.आदी नारायणा,डॉ. आंबेडकर ग्लोबल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. राजीव मेमन यांचेसह अनेक मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहेत. अमोल चवणे यांना हा सन्मानाचा पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# ग्रामस्थांच्या उपोषणासमोर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची नमती

## बेमुदत उपोषण मागे

**दि२४ विदर्भ प्रजासत्ताक** येवदातालुक्यातील येवदा गावात नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांसाठी सरकार दरबारी अर्ज, विनंत्या करूनसुद्धा त्या समस्यांचा निपटाला होत नसल्यामुळे प्रहारचे प्रदीप वडतकर यांच्या नेतृत्वाखाली विलास कैसर, सोपान वडतकर यांनी १९ नोव्हेंबरपासून बेमुदत उपोषणास सुरुवात केली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या मुद्यांशी निगडीत समस्या सोडविण्यासाठी अमरावती येथील कार्यकारी अभियंता नितीन उपरेलू, कार्यालयीन अधिकारी येवदा गावात उपोषण स्थळी आले. त्यांनी उपोषणकर्ते व गावकऱ्यांशी चर्चा करून लवकरात लवकर समस्या सोडवण्यासाठी तातडीने कारवाई केली जाईल असे आश्वासन दिल्याने अखेर उपोषण मागे घेण्यात आले.

ग्रामपंचायत येवदा यांच्या संबंधित समस्या व ग्रामसभेचे आयोजन हे सायंकाळी चार वाजता मुख्य गांधी चौकात करण्यात यावे या मुद्यावर विशेष अभिप्राय हा वरिष्ठांना मागून या समस्या लवकरच सोडण्यात येतील याबद्दलच्या आश्वासन ग्रामसेवक अरुण रायबोले यांनी आश्वासन दिले.या सर्व समस्यावर तोडगा काढण्यासाठी व मध्यस्थी करण्यासाठी आमदार बच्चू कडू यांचे प्रतिनिधी म्हणून सरपंच कसबेगव्हाण शशिकांत मंगळे यांनी विशेष सहकार्य लाभले.

# संतनगरी शेगावात अवतरली पंढरी! 'श्रीं'च्या पालखीची मंदिर परिक्रमा

## कार्तिकीनिमित्त लाखावर भाविकांनी घेतले दर्शन

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा** : लाखावर भाविकांची मांदियाळी, विठुमाऊली व गजानन महाराजांचा जयघोष, टाळ मृदुंगाच्या तालामुळे दुमदुमनारा मंदिर परिसर आणि श्रींचा पालखी सोहळा, यामुळे संतनगरी शेगाव येथे आज, गुरुवारी पंढरी अवतरल्याचे चित्र होते.

संत नगरी शेगावात लाखावर भाविकांच्या उपस्थितीत गुरुवारी कार्तिक एकादशीचा सोहळा उत्साहात पार पडला. संध्याकाळी कार्तिक एकादशीनिमित्त श्रींच्या पालखीची मंदिर परिक्रमा काढण्यात आली. भाविकांनी श्रींच्या रजत मुखवट्याचे दर्शन घेतले.

सकाळी ४ वाजतापासूनच गजानन महाराज समाधी स्थळाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या. श्रींच्या समाधी मंदिर दर्शनासाठी ३ तास लागत होते तर श्रींच्या मुखदर्शनासाठी पाऊण तास लागत होता. संध्याकाळी ५ वाजता टाळ, मृदंगाच्या निनादात व हरिनामाच्या गजरात श्रींची पालखी मंदिर परिक्रमेसाठी मार्गस्थ झाली. टाळकरी, पताकाधारी वारकऱ्यांचा सहभाग पालखी सोवत होता. संस्थानच्यावतीने श्रींच्या रजत मुखवट्याचे ब्रह्मवृंदाच्या मंत्रोच्चारात पारंपरिक पद्धतीने पूजन करण्यात आले. त्यानंतर श्री विठ्ठलाच्या तैलचित्राचे पूजन करण्यात आले. सूर्य मावळतीला जात असताना पालखी मंदिरात दाखल झाली. श्रींच्या पालखीचीही आरती करण्यात आली.

# प्रतिभा साहित्य संघाचे तिफन पुरस्कार जाहीर

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

कथा,कादंबरी आणि कविता या मराठी साहित्य प्रकारात ग्रामीण जनजीवनाचे सकस,वास्तवदर्शी लेखन करणाऱ्या लेखक आणि कविंना प्रतिभा साहित्य संघ,महाराष्ट्र,या साहित्य चळवळीच्या वतिने दरवर्षी लोककवी डॉ विठ्ठल वाघ तिफन,पुरस्कार देऊन गौरवण्यात येते.कोरोना काळापासून सदर पुरस्कार प्रलंबित असल्याने वर्षे २०१९-२०,२०-२१,२१-२२ व २२-२३ यावर्षींचे पुरस्कार संस्थापक अध्यक्ष विठ्ठल कुलट व निवड समितीच्या वतीने जाहीर करण्यात आले असून चिखलदरा येथील न.प.पालिका सभागृहात दिनांक ९व१०डिसेंबर २३ रोजी संपन्न होत असलेल्या प्रतिभा साहित्य संघाच्या राज्यस्तरीय चित्रांगण कला साहित्य संमेलनात मान्यवरांचे हस्ते देण्यात येणार आहेत. ज्ञानेश्वर शिंदे,गागलेगावकर,नायगाव यांच्या शाळा,नांदेड येथील अशोक कुबडे यांच्या गोंडर या कादंबरींना,प्रा.डॉ.प्रज्ञाकुमार गाथाडे ,यांच्या गावठाण,वणी,यवतमाळ येथील प्रा.डॉ.अनंता सूर यांच्या भोगवाटा कथासंग्रहांना तसेच मोहोळ येथील कवयित्री डॉ.सौ.स्मिता पाटील यांच्या नाही गिरवता येत कुठलीच लिपी,या कविता संग्रहाला लोककवी डॉ विठ्ठल वाघ तिफन पुरस्कार जाहीर करण्यात आले असून रोख रक्कम,तिफन स्मृतीचिन्ह,सन्मानपत्र,शाल,श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप असून पुरस्कार प्राप्त मान्यवर साहित्यिकांनी संमेलनास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिभा साहित्य संघाचे,अमरावती जिल्हाध्यक्ष राजेन्द्र ठाकरे यांनी केले आहे.

# उद्यापासून जिल्ह्यात चार दिवस पावसाची शक्यता

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** सध्या हिवाळा सुरू आहे,थंडीची हुडहुडी सर्वत्र जाणवू लागली आहे. पहाटे-पहाटे घराबाहेर पडून अनेकजण गुलाबी थंडीचा आनंद घेताना दिसत आहेत. तर दुसरीकडं थंडीमुळं काहीजण शेकोटीचा आसरा घेत आहेत. अशातच आता हवामान विभागाकडून एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. ऐन थंडीत आता पाऊस पडणार आहे. अमरावती जिल्ह्यासह विदर्भातील बहुतांश भागात पुढील चार दिवस, म्हणजे २७ नोंव्हेंबरपर्यंत पाऊस पडणार असल्याचंहवामान विभागानं म्हटलं आहे.



हिवाळ्यात पावसाचे कारण काय? : यावर्षी जुलै व ऑगस्ट महिन्यात पुरेसा पाऊस पडला नाही. तसेच आता हिवाळ्यात पाऊस येण्याचं कारण म्हणजे, अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागरकडचे वारे प्रशांत महासागराकडे जाऊशकत नाही. याठिकाणी तापमान जास्त असेलतरतिथे हवेचा दाब कमी होतो. तर दुसरीकडं हिंदी महासागर आणि अरबी समुद्रातील तापमान वाढलय. सध्या ३० ते ३१ अंश सेल्सिअस एवढे तापमान आहे. यातून जे बाष्प निर्माण होतेय, ते दक्षिणेच्या दिशेने येत आहे. त्यामुळं पावसाची शक्यता निर्माण होत आहे, असं हवामान तज्ज्ञांनी सांगितले आहे.

> **मुसळधार पावसाची शक्यता**
>
> राज्यात २५ आणि २६ नोव्हेंबर रोजी मुंबईसाठी 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. दुसरीकडंकोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात देखील पावसाची शक्यता आहे. दरम्यान, मुंबई, ठाणे, कल्याण, तसेच पश्चिम उपनगरात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# श्री एड.अभिजित देवके यांचे निधन

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर** – तालुक्यातील कळमगव्हाण येथील प्रतिष्ठित नागरिक,तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष तथा जिल्हा काँग्रेस कमिटीचे निष्ठावान नेते,जिल्हा महासचिव श्री ऍड.अभिजित रामदासपंत देवके यांचे आज दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास नागपूर येथे लिव्हर निकामी झाल्याने उपचारादरम्यान दुःखद निधन झाले.मृत्यू समयी ते ४९ वर्षाचे होते,त्यांच्यावर तिने महिने पासून उपचार सुरू होते.दर्यापूर तालुक्यातील निष्ठावान काँग्रेस नेते,शांत,संयमी,अभ्यासू नेतृत्व,उत्तम वक्ते,निवेदक तथा पत्रकार म्हणून त्यांचा जिल्हाभर नावलौकिक होता.दर्यापूर तालुक्यातील विविध सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता.त्यांनी दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे बांधकाम सभापती म्हणून सुद्धा उत्कृष्ठ कार्य केले आहे.ते वैद्यकीय अधिकारी डॉ आश्विनी देवके यांचे पती होते.त्यांची अंतिम यात्रा राहते घर, मंगलधाम, नारायण नगर,दर्यापूर येथून आज संध्याकाळी ७ वाजता निघणार असून बाभळी मोक्षधाम येथे त्यांचा अंतविधी होणार आहे, अशी माहिती



देवके परिवार यांनी दिली आहे.त्यांच्या पश्चात आई,भाऊ,वहिनी,पत्नी,मुलगा,मुलगी असा बराच मोठा आप्त परिवार आहे.त्यांना दर्यापूर तालुका व शहर काँग्रेस कमिटी, खरेदी विक्री संघ दर्यापूर व मित्र परिवार यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे.

# उद्यापासून शहरात रंगणार दुसरी राज्यस्तरीय खेलो मास्टर्स क्रीडा स्पर्धा

## विविध क्रीडा क्षेत्रातील नामवंत मास्टर्स गाजवतील मैदान



**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** अमरावती डिस्ट्रिक्ट खेलो मास्टर्स गेम्स असोसिएशन व श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमख यांच्या १२५ व्या जयंती महोत्सवानिमित्त २५ व २६ नोव्हेंबरला दुसऱ्या राज्यस्तरीय खेलो मास्टर्स क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय स्पर्धेत वय वर्ष ३० ते १०० वर्ष वयोगटातील महिला–पुरुष या स्पर्धेत भाग घेणार आहेत.

या स्पर्धेत कुस्ती, रायफल शूटिंग, हॉकी, खो–खो, जलतरण, कबड्डी, फुटबॉल अश्या विविध १५ क्रीडा प्रकारातील मास्टर्स खेळाडू त्यांच्या कौशल्याचे प्रदर्शन करतील. या स्पर्धेसाठी जिल्ह्याच्या खासदार नवनीत राणा यांनीं गोळाफेक स्पर्धेसाठी, आमदार यशोमती ठाकूर यांनी रायफल शूटिंग, आमदार सुलभा खोडके यांनी वाकिंग, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी वाकिंग, प्रा.डॉ अंजली ठाकरे यांनी थाळीफेक स्पर्धेसाठी तसेच विविध नामवंन्त खेळाडूंनी मास्टर्स स्पर्धक म्हणून नोंदणी केली आहे.

लुडो–क्रिकेट–फुटबॉल–कबड्डी हे सर्व मैदानी खेळ केवळ मोबाईलवरच खेळण्याचा नाद जडलेली तरुणाई किमान आपल्या आई–वडील, आजोबा यांना बघून तरी मैदानावर येतील, हा हेतू या आयोजनाचा असल्याचे आयोजकांनी सांगितले. खेलो मास्टर्स गेम्स असोसिएशन महाराष्ट्र संलग्नीत अमरावती डिस्ट्रिक्ट खेलो मास्टर्स गेम्स असोसिएशन व श्री शिवाजी शिक्षण संस्था यांचे सहकार्याने आयोजित या दुसऱ्या राज्यस्तरीय खेलो मास्टर्स क्रीडा स्पर्धेसाठी श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, विभागीय क्रीडा संकुल व श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथील मैदाने निश्चित करण्यात आली आहेत.

या स्पर्धेत कुस्ती, खो–खो, बॅडमिंटन, कबड्डी, आर्चरी, रायफलशुटींग, टेबल टेनिस, व्हॉलीबॉल, फुटबॉल, शुटींग बॉल, हॉकी, जलतरण, बास्केटबॉल, मैदानी स्पर्धा, नेट बॉल अश्या एकूण १५ खेळांचा समावेश आहे. यातून प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांक घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या जयंती महोत्सवानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या सहकार्यातून पुरस्कार स्वरूप पदके प्रदान केले जातील. स्पर्धेचे उद्घाटन २५ नोव्हेंबरला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत होईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही सदर उदघाटणीयकार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले आहे. शिवाजी शिक्षण संस्थेच्या संपुर्ण कार्यकारीनीच्या उपस्थितीत सकाळी ९ वाजता स्पर्धेचे उदघाटन होईल. या स्पर्धेमध्ये अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू सहभागी होणार असून स्पर्धेचे ते विशेष आकर्षण ठरणार आहेत.

खेळ प्रतिभा जोपासण्याची संधी देणाऱ्या या स्पर्धेमध्ये अमरावती जिल्हयातील व महाराष्ट्रातील संपुर्ण खेळाडूंनी सहभागी होवून खेळ प्रवृत्तीला येणाऱ्या नविन पिढीसमोर एक आदर्श निर्माण करावा असे आवाहन आयोजन समितीव्दारे करण्यात आले आहे.

# १३ ग्रामपंचायतचे उपसरपंच बिनविरोध तर ६ ठिकाणी निवडणूक

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – जिल्ह्यात ८ तालुक्यामधील १९ ग्रामपंचायतीं च्या उपसरपंचपदाच्या निवडणुकी गुरूवार २३ नोव्हेंबर रोजी नवनियुक्त सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली सदस्यांमधून उपसरपंच पदाची निवडणूक पार पडली. या निवडणूकीत १३ ग्रामपंचायतींचे उपसरपंच अविरोध निवडूण आले आहेत. तर सहा ठिकाणी निवडणूक घेण्यात आली. १९ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका ५ नोव्हेबर रोजी पार पडल्यात. या ग्रामपंचायतीत सरपंच पदाकरीता थेट निवडणूक घेण्यात आली.या निवडणूकीचा निकाल ६ नोव्हेंबरला जाहीर झाल्यानंतर नव्याने गठीत ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदासाठीची पहिली सभा २३ नोव्हेंबर १९ ग्रामपंचायतीमध्ये आयोजित करण्यात आली होती. या सभेत भातकुली,चांदूर रेल्वे, मोर्शी, अचलपूर, चांदूर बाजार, अंजनगाव सुजी ,धारणी,चिखलदरा या तालुक्यातील १३ ग्रामपंचातींचे उपसरपंच बिनविरोध निवडूण आले आहेत.तर ६ ग्रामपंचातीमध्ये मात्र उपसरपंच पदाकरीता निवडणूक पार पडली. बिनविरोध निवडणूक आलेले सरपंच असे भातकुली तालुक्यातील बैलमारखेडा ग्रामपंचायतींच्या उपसरपंच पदी कांताबाई राणे, चांदूर रेल्वे मधील कारला येथे शैलेद्र




गिरासे,पाथरगांव रविंद्र मोखळे, मोर्शीमधील गोराळा प्रज्ञा खडसे, ब्राम्हणवाडा पंकज पांडे, अचलपूर मधील देवगाव ग्रामपंचायत उपसरपंच पदी गोविंदा पाटील,कोठारा संदेश पलधामोल, चांदूर बाजार तालुक्यातील मिर्झापूर अशोक उके,अंजनगाव सुजी मधील जवळा बु.सरला बहिरे,हयापूर–योगेश भारसाकळे,धारणी मधील जामपाणी मदत जावरकर, आणि चिखलदरा तालुक्यातील सोनापूर –शंकर बेलसरे,टेब्रुसोंडा–अनिता उमरकर आदी उपसरपंच बिनविरोध निवडून आले आहेत.

**येथे पार पडली निवडणूक**

ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदासाठी पार पडलेल्या निवडणूकीत विजयी झालेल्या उपसरपंचामध्ये मोर्शी तालुक्यातील मनिमपूर येथे शिवा मेश्राम,रिध्दपूर विलास वानखडे,अचलपूर मधील पिंपळखुटा वंदना सावलकर,निमदरी रमेश बेलसरे,धारणी तालुक्यातील बोबदो उर्मिला पटेल,महरीआम राजू अखंडे आदी ठिकाणी उपसरपंच निवडून आले आहेत.

# येवदा येथील कृषी केंद्राचा परवाना रद्द

## अमरावती जिल्हा कृषी अधीक्षकांची धडक कारवाई

दि२४ विदर्भ प्रजासत्ताकयेवदा

किटकनाशक औषधी व रासायनिक खते नियंत्रण आदेशाच्या तरतुदीचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्याने जिल्हा कृषी अधीक्षक यांनी दर्यापूर तालुक्यातील येवदा येथील रोहित ॲग्रो या दुकानाचा किटकनाशक औषध विक्रीचा परवाना कायस्वरूपी रद्द केला आहे. तर कृषी केंद्राचा रासायनिक खत परवाना आगामी सहा महिन्यांसाठी निलंबित केला आहे.

येवदा येथील रोहित हरिकिशोर राठी हे संचालक असलेल्या रोहित ॲग्रो या किटकनाशके औषध, रासायनिक खते व बी–बियाणे विक्रीच्या दुकानातून साहित्य विक्री करतांना अनियमितता होत असल्याच्या तक्रारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाली होती. त्यामुळे कृषी विभागाच्या जिल्हाअश्या ठिकाणी प्रदर्शित केलेला नव्हता. नोंदणी प्रमाणपत्रांमध्ये दुकानात विक्री ठेवण्यात आलेल्या सर्व




स्त्रोतांचा समावेश करून घेतला नव्हता. विक्री करीत असलेल्या रासायनिक खताची बिले ठेवलेली नव्हती. साठा रजिस्टर, शिल्लक खतसाठा व प्रपत्रात शिल्लक असलेला खत साठा जुळत नव्हता. रासायनिक खताच्या सर्व बिलांमध्ये सर्व मजकुर समाविष्ट नव्हता. शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या बिलावर विक्रेत्याचे व शेतकऱ्याची स्वाक्षरी घेतली जात नसल्याचे निदर्शनास आले. याशिवाय सदर दुकानातून यश ट्रेडर्स, मेन रोड, येवदा या नावाने रासायनिक खते विक्री करीत असल्याचे बिल बुक आढळून आले. पूर्वीच्या तपासणीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता रोहित ॲग्रो च्या संचालकांनी केली नसल्याचे निदर्शनास आल्याने सदर परवाना रद्द करीत खत परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे दर्यापूर तालुक्यातील कृषी विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे

# ‘समृद्धी’वर तपासणी वाहनांसाठी अजब अटी

## ‘एमएसआरडीसी’च्या नवीन नियमांनी परिवहन खाते त्रस्त

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) समृद्धी महामार्गावर तपासणीसाठी परिवहन खात्याला भाडय़ाची वाहने उपलब्ध करून दिली आहेत. परंतु, या सोबतच दैनिक लॉग बुक नोंदीसह इतरही अजब अटी घातल्याने परिवहन खात्याच्या अधिकाऱ्यांमध्ये नाराजी आहे.‘एमएसआरडीसी’च्या अखत्यारित असलेल्या समृद्धी महामार्गावर वाढते अपघात हा चिंतेचा विषय ठरला आहे. त्यामुळे परिवहन खात्याने ‘एमएसआरडीसी’कडून महामार्ग तपासणीसाठी ६ महिन्यांकरिता भाडेतत्त्वावर ८ वाहने घेतली.



या वाहनांचा नुकताच करार संपुष्टात आला. त्यामुळे परिवहन खात्याने पुन्हा एमएसआरडीसीला वाहने उपलब्ध करण्याची विनंती केली. त्यामुळे ‘एमएसआरडीसी’कडून वाहनांना तीन महिने मुदतवाढ देण्यात आली. परंतु ही वाहने देताना अजब अटी घातल्या. त्यानुसार या सर्व वाहनांचे लॉग बुक आरटीओ अधिकाऱ्यांना रोज अद्ययावत करायचे आहे, या वाहनांचे देयक समृद्धी महामार्गाचे प्रकल्प संचालक यांच्या शिफारशीनेच सादर करायचे आहे. परंतु, ही कारकुनी अधिकाऱ्यांना मान्य नसल्याने त्यांच्यात प्रचंड नाराजी आहे.

**अधिकाऱ्यांकडून प्रतिसाद नाही**

या विषयावर परिवहन आयुक्त विवेक भिमनवार आणि हा विषय हाताळणारे भरत कळसकर यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नाही. ‘एमएसआरडीसी’च्या मुंबईतील कार्यालयात संपर्क केला असता बांद्रे कार्यालयाशी संपर्काचा सल्ला दिला गेला. बांद्रे कार्यालयात संपर्क होऊ शकला नाही.

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे

# ५ विद्यार्थ्यांची विप्रो पारी प्रा. लि. कंपनी मध्ये निवड



**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप या युवकांना रोजगार देणारा अग्रणीय ग्रुप आहे. सातत्याने इंजिनीरिंग, एम. बी. ए. तसेच एम. सी. ए. च्या विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणात कॅम्पस ड्राईव्हज चे आयोजन केले जात आहे. या मध्ये विविध बहुराष्ट्रीय कंपनीज जसे टी. सी. एस., कॅप्जेमिनी, कॉग्निझंट, ॲसेनचर, विप्रो, झेन्सार, इन्फोसिस, पर्सिस्टन्ट, एल अँड टी इन्फोटेक, इन्फोसेप्ट, पॅरेन्ट पे, कोलाबेरा, ग्लोबल लॉजिक, टेक महिंद्रा, केपीआयटी, एच. सी. एल., ग्लोबलीया सॉफ्ट, एडीपी, सम्यक इन्फोटेक, सेलेबल टेकनॉलॉजिज, डीएसपीएल, निओसोफ्ट, आरवाडे इन्फ्रास्ट्रक्चर, विप्रो पारी प्रा. लि., परफीशीयंट, डी मार्ट, श्रीराम फायनान्स या व इतर कंपनीज चा समावेश आहे.

इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनीरिंगच्या बॅच २०२४ विद्यार्थ्यांसाठी विप्रो पारी प्रा. लि. या कंपनीसाठी आयोजित केलेल्या कॅम्पस ड्राईव्ह मध्ये इलेक्ट्रिकल च्या ३ आणि मेकॅनिकल च्या २ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. ज्यामध्ये बादल पवार, प्रणित पारडे, हेमंत मुंदाने, प्रतीक शेळके व जय यादव यांचा समावेश आहे. निवड प्रक्रियेमध्ये प्रथम ऑनलाईन टेस्ट घेण्यात आली, त्यानंतर विद्यार्थ्यांचे टेक्निकल इंटरव्हिव तसेच एच. आर. इंटरव्हिव घेण्यात आले. प्रिसिजन ऑटोमेशन अँड रोबोटिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (झ–ठख), ज्याचे मुख्यालय पुणे, भारत येथे आहे, त्याची स्थापना १९९० मध्ये झाली. ही संस्था १३००+ कर्मचारी आणि जगभरातील अनेक सुविधांसह सर्वात मोठ्या जागतिक ऑटोमेशन कंपन्यांपैकी एक आहे, तिचे मुख्यालय पुणे, भारत येथे आहे. Wipro Infrastructure Engineering (WIN), Wipro Enterprises (P) Limited चा व्यवसाय आहे, २०१८ मध्ये औद्योगिक ऑटोमेशनसाठी समाधान प्रदाता म्हणून ऑटोमेशन व्यवसायाची स्थापना केली. २०२१ मध्ये विप्रो झ–ठख बनण्यासाठी झ–ठख चे अधिग्रहण केले. विद्यार्थ्यांच्या कॅम्पस प्लेसमेंट मध्ये सहाय्यक असणारे सर्व प्रकारचे ट्रैनिंग विद्यार्थ्यांना फिनिशिंग स्कूल द्वारे सर्वांना मोफत दिले जाते. ज्या मध्ये अँटिट्यूड, रिसोनिंग, इंग्लिश कम्युनिकेशन, ग्रुप डिस्कशन, रीझुम तयार करणे तसेच इंटरव्हिव्ह ची तयारी अंतर्भूत आहे. विद्यार्थ्यांना इंजिनीरिंग च्या फर्स्ट इयर पासूनच कॅम्पस रिक्रुटमेंट चे ट्रेनिंग दिले जाते. सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेच्या मॅनेजमेंट ने तसेच महाविद्यालयाचे संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, संपूर्ण टिचिंग व नॉन टिचिंग स्टाफ ने अभिनंदन केले असून पुढील वाटचालीकरता शुभेच्छा दिल्यात

# फासेपारधी बांधवांना किती दिवस रावे लागणार उघड्यावर

## गाव पारधी व फासेपारधी चा सुरू होणार आहे वाद



**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर**दर्यापूर नगरपरिषद हद्दीत भरोसा पारधी पाळा गेल्या वीस वर्षापासून कार्यरत आहे त्यावर त्यांनी आपल्या छोटे–मोठे कुळाचे तर मातीचे घरे सुद्धा उभारली आहे मात्र आता घरकुल योजना सर्वांसाठी बोभाटा केल्या जातो जाहिराती केल्या जातात मात्र अधिकारी मनमानी पणा करून फासेपारध्यांना गणेशपूर येथे राहायला सांगतात तर गणेशपुर वाले म्हणतात की आम्हाला प्लॉट द्या आता हा वाद सुरू असल्याने फासेपारधी घरकुलापासून वंचित राहत आहे रोज सकाळी आमदार बळवंत वानखडे यांच्या कार्यालयात येऊन वारंवार मागणी करतात मात्र त्यांना चकरा मारल्याशिवाय काहीच होत मिळत नाही कारण नगरपरिषद मध्ये होल अँड सोल प्रशासक तोच मुख्याधिकारी नंदू पारळकर हे काम पाहतात त्यामुळे एक सुत्री कारभार आहे तिथे कोणाचे काही चालेना देवाजीच्या आले म्हणा त्याचे कोणाचे काही चालेना कारण फासेपारधी काल नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना कार्यालयात जाऊन ठिय्या आंदोलन केले होते मात्र त्यांना गाव पारधी व फासेपारधी अशा स्थितीमध्ये जागा अटकल्याने बनवता येतील फासेपारधी गणेश पुरला जायला तयार नाही व गणेश पुरचे गाव पारधी ते प्लॉट आम्हाला द्या अशी मागणी करत आहे त्यामुळे बनोसा येतील फासेपारध्यांना ज्या जागेवर राहतात त्या जागेवर त्यांचे जागा नावे करून त्यांना घरकुलाचा लाभ द्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दत्ता पाटील कुंभारकर यांनी फासेपारधी राहतात परिसराला भेट दिली असता त्यांनी सांगितलेली माहिती घेऊन फासेपारध्यांना हक्काचे घर व जागा द्यावी अशी मागणी दत्ता पाटील कुंभारकर यांनी केली आहे.

# उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांचे हस्ते विद्यापीठ अधिसभा सभागृहाचा नामकरण कार्यक्रम संपन्न

## अधिसभा सभागृहाला डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे नाव

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अधिसभा सभागृहाचे डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख अधिसभा सभागृह असे नामकरण करण्याचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री ना.श्री. चंद्रकांतदादा पाटील यांचे शुभहस्ते संपन्न झाला. नामकरण कार्यक्रमप्रसंगी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद व अधिसभा सदस्य तथा श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी देशमुख, राज्यसभा




सदस्य डॉ. अनिल बोंडे, माजी पालकमंत्री आ. प्रवीण पोटे, आ. प्रतापदादा अडसड, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख आदी उपस्थित होते.

प्रशस्त वातानुकुलित हॉल, अद्ययावत साऊंड सिस्टीम व्यवस्था, शंभरचे वर बैठक व्यवस्था तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने सज्ज असे हे डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख अधिसभा सभागृह आहे. अधिसभा सभागृहाला भारताचे कृषिमंत्री, शिक्षणाची गंगा खेडोपाडी पोहोचविणारे शिक्षणमहर्षि डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे नांव देण्याचा ठराव विद्यापीठ अधिसभेत सदस्य डॉ. रविंद्र मुंद्रे यांनी मांडला होता. त्यांचा ठराव सर्वानुमते सभागृहाने मान्य केला होता. सदर नामकरण प्रस्तावाला व्यवस्थापन परिषदेने मान्यता प्रदान करुन सभागृहाचे नामकरण डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख अधिसभा सभागृह असे करण्यात आले.

नामकरण कार्यक्रमाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषद, अधिसभा व विद्या परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य, माजी प्राधिकारिणींचे सदस्य, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी तसेच शहरातील गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री शिंदे राजस्थानात

**दि. २४ विदर्भ प्रजासत्ताक मुंबई:**

राजस्थानमधील काँग्रेस सरकार सर्व आघाडय़ांवर अपयशी ठरले असून विकासाच्या बाबतीत हे राज्य १५ वर्षे मागे गेले आहे. विकासापासून वंचित राहिलेल्या राजस्थानमध्ये आता महाराष्ट्राप्रमाणे डबल इंजिन सरकारची गरज असून राज्यातील भगवे वातावरण पाहता परिवर्तन अटळ असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरूवारी केले.

राजस्थान विधानसभा निवडणुकीसाठी २५ नोव्हेंबर रोजी मतदान होत असून प्रचाराच्या अखेरच्या दिवशी शिंदे यांनी भाजपा उमेदवारांचा जोरदार प्रचार केला. शिंदे यांनी जयपूरसह काही ठिकाणी रोड शो केला. तसेच कोटपुतली विधानसभा मतदार संघात हंसराज पटेल यांच्या प्रचारार्थ विजय संकल्प सभा घेतली. राजस्थानमध्ये भगवी लाट असून यावेळी भाजपाचे सरकार बहुमताने सत्तेवर येईल. गेल्या पाच वर्षांत काँग्रेस सरकारने लोकांनी फसवणूक केली असून राज्यात रस्त्यांची दुरावस्था आहे. तसेच भ्रष्टाचार, महिलांवरील अत्याचारात राजस्थानमध्ये वाढ झाली असून सरकारने शेतकऱ्यांची फसणूक केल्याचा आरोप शिंदे यांनी केला. केंद्रातील मोदी सरकारच्या पाठिब्यामुळे महाराष्ट्रात जोरदार विकासकामे सुरू आहेत.

# आजपासून घरा - घरात तुळशी विवाहारंभ.....!!

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

गुरुवार २३ नोव्हेंबर रोजी प्रबोधिनी एकादशी झाली आणि आज २४ ला चातुर्मास संपतो आहे. यानंतर तुलसी विवाहासह सर्व लग्नकार्य, मुंडण, बारसं यासह सर्व शुभ कार्य सुरू होतात. कार्तिक शुद्ध एकादशीपासून तुलसी विवाह प्रारंभ होऊन कार्तिक पौर्णिमेपर्यंत हा विधी चालतो. यंदा २४ नोव्हेंबर २०२३ रोजी तुलसी विवाह प्रारंभ होत आहे.

दिवाळी संपली की, सर्वांना वेध लागतात ते तुळसीच्या लग्नाचे. कार्तिक शुद्ध एकादशीपासून तुळशी विवाह प्रारंभ होऊन कार्तिक पौर्णिमेपर्यंत हा विधी चालतो. यंदा २४ नोव्हेंबर २०२३ रोजी तुलसी विवाह प्रारंभ होत आहे. कार्तिकी एकादशीला सर्व मंगलकार्यांची सुरुवातकेली जाते. तुळशी विवाह केल्याने कन्यादानाचे पुण्यङ प्राप्त होते, अशी मान्यता आहे. विवाहाच्या पूर्वदिवशीतुळशी वृंदावन रंगवून सुशोभित करतात. वृंदावनात ऊस, झेंडूची फुले घालतात आणि मुळाशी चिंचा अन् आवळे ठेवतात. हा विवाह सोहळा सायंकाळी करतात.



### असे सजवा तुळशी वृंदावन

घराच्या अंगणात असणाऱ्या तुळशी वृंदावनला सजवण्यात येते. तुळशी वृंदावन, तसेच कुंडी रंगवून त्यावर राधा-दामोदरचे चित्र काढण्यात येते. फ्लॅट संस्कृतीत अनेकांनी तुळशीला आपल्या बाल्कनीत जागा दिली असून त्या ठिकाणीच लग्नाची तयारी केली जाते. तुळशीच्या रोपट्याभोवती ओढणी किंवा लालरंगाचे वस्त्र चढवा. तुळशी विवाहाला तुम्हाला तुमचे अंगण आकर्षक रांगोळ्यांनी सजवायचे असेल, तर छान रांगोळीही काढण्यात येते. प्रत्येकजण आवडी प्रमाणे आणि हौस म्हणून तुळशीला सजवण्याचा प्रयत्न करत असतो. काही जण तुळशीच्या रोपट्याला साडी देखील नेसवतात. तुळशीला नवरीसारखे सजवण्यात येते. तुळशीची गौरीप्रमाणे पूजा करतात. तिला साडी, चोळी, नथ, सोन्याचे दागिने घालतात. सोन्याचे मंगळसूत्र, चांदीची जोडवी, खणा-नाराळाने ओटी भरतात. तुळशीला नैवद्याचे गोड पदार्थघराण्याच्या परंपरेनुसारकेले जातात.

### अशी करावी पूजा

लक्ष्मी-नारायणाची मूर्ती व तुलसीपत्रासोबत सोने व चांदीची तुळस आसनावर ठेवावी, यजमानाने म्हणजे श्रीकृष्णाने पत्नीसोबत उत्तराभिमुखआसनावर बसवावे. गोरज मुहूर्तावर वराचे पूजन करावे. तुळशीचा विवाह केल्याने भगवाण विष्णू आणि लक्ष्मी प्रसन्न होते. कारण, पोथी- पुराणात सांगितलेल्या कथेनुसार तुळस ही लक्ष्मीचे तर भगवान विष्णूने शाळीग्रामचे रुप धारण केले होते.

# श्री हव्याप्र मंडळाची शुटर जानवी ची इंडिया टीम ट्रायलसाठी निवड : पद्मश्रींच्या शुभेच्छा

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भोपाळ येथे १९ नोव्हेंबर ते ९ डिसेंबर २०२३ पार पडलेल्या ६६ व्या राष्ट्रीय शूटिंग चॅम्पियनशिप २०२३ स्पर्धेत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जानवी मानतकर हिने यशाचा अचूक नेम साधला.

२५ मीटर फायर आर्म स्पोर्ट पिस्टोल प्रकारात जानवी विद्याधर मानतकर (वय १५ वर्षे) हिने अत्यंत कमी सराव करून पहिल्याच प्रयत्नात रिनाउंड शूटर होऊन इंडिया टीम ट्रायल्स साठी स्वतःची जागा मिळविली आहे.

तसेच १० मीटर पिस्टोल शूटिंग प्रकारात युथ, जुनिअर, व सिनिअर या तिन्ही गटातून सुद्धा जानवीची इंडिया टीम ट्रायल मध्ये निवड झाली आहे. मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांचे आशीर्वाद सचिव डॉ. माधुरीताई चेंडके यांचे मोलाचे




पाठबळ आणि शूटिंग विभाग प्रमुख व प्रशिक्षक राहुल उगले यांचे अथक परिश्रम व योग्य मार्गदर्शनामुळे आपणास यश मिळवता आले असे जानवी मानतकर ने व्यक्त केले.

अमरावती शहरात कुठेही फायर आर्म ची रेंज नसून मंडळाच्या शूटिंग विभागाचे प्रमुख आणि प्रशिक्षक राहुल उगले यांच्या मार्गदर्शनावर विश्वास ठेवून जानवी ने फक्त पिस्टोल होल्डिंग करून ह्या स्पर्धेत हे यश मिळविले आहे. तिच्या यशाबद्दल आणि पुढील वाटचालीकरता मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, मंडळाचे कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, प्रा. ललित शर्मा, आनंद महाजन, यांचेसह सर्व पदाधिकारी, विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-खेळाडूंनी प्रशिक्षक राहुल उगले व जानवी मानतकर यांचेवर शुभेच्छांचा वर्षाव करीत आहे.

# सामान्य लोकांना अध्यात्मिक व भक्तिमार्गाची वाट दाखविण्याचे काम संतांनी केले : आ. सुलभा खोडके

## यशोदा नगर स्थित आसरा माता विठ्ठल मंदिर येथे श्री शिव महापुराण कथा

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भगवान श्री विठ्ठल वारकरी संप्रदायाचे भक्तीपंथाचे परम दैवत ! महाराष्ट्रातील सर्व संतांनी श्री विठ्ठलाच्या निर्गुण आणि सगुण रूपाचे,भक्तीचे,प्रेमाचे,शरणागत वत्सलतेचे अनुभूतीचे वर्णन आपल्या काव्यातून केले आहे. संतांनी वर्णिलेला विठ्ठल अनाथांचा नाथ आहे. संसारातील चिंतांनी ग्रस्त झालेल्यांच्या आधार आहे. सामाजिक विषमता नष्ट करून सामाजिक एकात्मतेचे समरसतेचे प्रस्थापन करणारा आहे. आर्त भक्ताला कैवल्याचा मार्ग दाखविणारा आहे. महाराष्ट्र ही पुण्यभूमी आहे. महाराष्ट्राला संतांची थोर परंपरा लाभली आहे. म्हणूनच देवांनी अवतारही याच भूमीमध्ये घेतलेत.या भूमीत काळानुसार अनेक संत झाले व विठ्ठल भक्तीत न्हाऊन निघाले. अनेक संतांनी त्या काळात आपल्या




लाडक्या परमेश्वर विठ्ठलाचे ओवीद्वारे, भजनाद्वारे, काव्याद्वारे गोडवे गायिले. ते भक्तीत रममाण झाले व सामान्य लोकांना आध्यात्मिक व भक्तिमार्गाची वाट दाखविण्याचे काम संतांनी केले.संत ज्ञानेश्वर माऊली व तुकोबाराय यांनी भक्त भाविकांच्या मनात वारकरी संप्रदायाची बीजे रोवली. असे प्रतिपादन आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी श्री शिव महापूराण कथा कार्यक्रम स्थळी उपस्थितांना संबोधून केले.गुरूवार दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी यशोदा नगर नंबर -२ परिसर स्थित ओळ क्रमांक -६ येथील आसरा माता विठ्ठल मंदिर स्थित आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. दरवर्षी प्रमाणे यंदाही आसरा माता बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने यावर्षी धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमाच्या शृंखलेत श्री शिव महापुराण कथा चे आयोजन करण्यात आले आहे. कार्तिक शुद्ध अष्टमी अर्थातच दिनांक २० नोव्हेंबर ते कार्तिक शुद्ध पौर्णिमा म्हणजेच दिनांक २७ नोव्हेंबर २०२३ पर्यंत स्थानिक परिसरात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्तिकी एकादशी निमित्ताने गुरुवारी कार्तिक शुद्ध दशमीच्या पावन पर्वावर आमदार-सौ. सुलभाताई खोडके यांनी या आयोजन स्थळी भेट दिली. यादरम्यान शिव महापुराण कथा प्रवक्ते- श्री हरिभक्त परायण अरुण महाराज सावंत ( आळंदीकर) हल्ली मुक्काम- मेहकर बरटाळा यांच्या सुश्राव्य वाणीतून यावेळी त्यांनी कथा श्रवणाचा लाभ घेतला.याप्रसंगी आमदार- सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते भगवान श्री शिवशंकर यांच्या प्रतिमेस पूजन-वंदन-माल्यार्पण करण्यात आले. यावेळी त्यांच्या हस्ते श्री शिव महापुराण कथेची आरती करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर आमदार-सौ. सुलभाताई खोडके यांच्या समवेत अमरावती महानगरपालिकेचे स्थायी समितीचे माजी सभापती- अविनाश मार्डीकर,माजी नगरसेवक -मंगेश मनोहरे,आसरा माता बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष- मनीष उर्फ छोटू पाटील उपस्थित होते. यादरम्यान छोटू पाटील यांच्या हस्ते आमदार सौ. सुलभाताई खोडके यांचा व अन्य मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

# पोटे आयुर्वेद रुग्णालयात यकृत उपचार शिबीर संपन्न

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,**

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर ट्रस्ट व्दारा संचालीत पी आर पोटे पाटील इन्स्टिट्युट ॲन्ड हॉस्पीटल ऑफ मेडीकल सायन्सेस आयुर्वेद विद्यमाने दिनाक २३ नोव्हेंबर ला पी. आर, पोटे पाटील आयुर्वेद रूग्णालय, पोटे पाटील रोड, कठोरा बु. अमरावती येथे यकृत (Liver Disorder) उपचार शिबीरात ११० रुग्णावर उपचार करण्यात आले.

या शिबीरामध्ये काविळ होणे, मलबध्दता, आम्लपित्त, यकृतावर सुज येणे, Billirubin वाढ होणे, Liver Cirrhosis पोटात पाणी होणे (जलोदर), रक्ताची उल्टी होणे या व्याधीवर मोफत तपासणी व चिकित्सा करण्यात आले, या शिबीराला डॉ. चरण पुं. सोनारे, आयुर्वेदाचार्य व पंचकर्म व योग चिकित्सातज्ञ या तज्ञांनी आपली सेवा दिली.

संस्थेचे अध्यक्ष आमदार प्रविणभाऊ पोटे पाटील, श्री. श्रेयशदादा पोटे पाटील व महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. श्याम भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. चैतन्य कावलकर, डॉ. हेमलता माहोरे, डॉ. गौरव खवले, डॉ. सोनाली ठाकरे, डॉ. स्वाती सावरकर, डॉ. अभय पांडे, डॉ. दिपाली नवले, डॉ. दिलीप चहाटे, डॉ. राजेश ठाकरे, डॉ. स्नेहल अतकरी, रोशनी पेठे, अजिंक्य माहोरे यांचे विशेष सहकार्य लाभले.






# भातकुली कृषी कार्यालयावर नितीन कदम यांची शेकडो शेतकऱ्यांसह धडकले : शेतकऱ्यांचा पिकविमा प्रश्न पेटला

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक भातकुली**

स्थानिक बडनेरा ग्रामीण भागातील भातकुली तालुक्यामध्ये शेतकरी वर्गाला विवीध नैसर्गिक - अनैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागतो. विवीध माध्यमातून ते आपल्या निदर्शनास येते.शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसान संदर्भात शासन उदासीन असल्याचे चित्र दिसून येत आहे.पंचनामे झाल्यानंतरही नुकसाभरपाईची रक्कम मिळेल या प्रतीक्षेत शेतकरी असताना दरम्यान शासनाने व पिकविमा कंपन्यांनी नुकताच पीकविमा रक्कम जाहीर केली. यावेळी नुकसाभरपाईची रक्कम ऐकताच शेतकरी अवाक झाले. या अग्रिम रकमेत अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याचे आढळून आले. अमरावती जिल्ह्यासाठी केवळ ८ लक्ष रुपयांची रक्कम जाहीर करण्याचे परिपत्रक जाहीर झाले. प्रत्येकी शेतकऱ्याला मिळणारी रक्कम ही केवळ ७८ रुपये इतकी असुन शेतकरी वर्गात खळबळ उडाली.संबधीत बाब समाजसेवी नितीन कदम यांच्या निदर्शनास येताच शेकडो शेतकऱ्यांसमवेत तालुका कृषी कार्यालयावर धडक मोहीम राबवत सर्वांचे लक्ष वेधले. शेतकऱ्यासोबत कश्या प्रकारे अन्यायकारक भूमिका शासन घेत आहे ? याबद्दल जाब विचारत पिकविमा रक्कम वाढवून देण्याचे निवेदन नितीन कदम यांच्या नेतृत्वात देण्यात आले.*शासनाने मंजूर केलेल्या १७०० कोटी रुपयांचा अग्रिम पिकविमा हा जाहीर केला. त्या पिकविमा रकमेमध्ये अमरावती जिल्हाच्या नावे फक्त ८ लक्ष रुपये देण्यात आली. त्या ८ लक्ष रकमेमध्ये शेतकऱ्यांची संख्या १०२६५ एवढी असून असुन म्हणजे प्रत्येकी ७८ रुपये येत आहे. सदर पिकविम्याची रक्कम अमरावती जिल्ह्याकरिता जाहीर करत शासनाने स्थानिक शेतकऱ्यांची चेष्टा केल्याचे आरोप यावेळी शेतकऱ्यांनी केले.* *यामध्ये सुधारणा करून शासनाचे आश्वासन केलेली २५ % रक्कम ही शेतकऱ्यांना देण्यात यावी त्याचप्रमाणे पंतप्रधान किसान योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना सदर योजनेचा लाभ मिळावा यासंदर्भातील निवेदन नितीन कदम यांच्या नेतृत्वात शेकडो शेतकऱ्यांसह देण्यात आले.*यावेळी स्वप्निल मालधुरे, आकाश पाटील,अभिषेक सवाई, सागर पंचबुद्धे, विनोद पतलीया, प्रफुल्ल महल्ले, दिनू ठाकरे, सोपान भटकर, आकाश बांबर, सागर बारब्दे, मोहन भातकुलकर, परेश मोहोळ, आनंद मोहोड, सचीन देशमुख, राहुल वानखडे, बाबूराव वानखडे, धीरज देशमुख, जयंत पवार, गजानन लेंडे, शंकर बरडे, बंशिभाऊ लाठी, गजानन सवाई, किशोर सरोदे, अर्पण भजभुजे, आकाश मानकर, गोपाल रौराडे, संदीप कोलटेके, भोजराज कोलटेके, प्रदीप मोहोड, गोलू वाघ, श्रीकांत सवाई, संजय सवाई, अशोक झाडे, भुवन दहिकर, सूरज पवार, आनंद ठाकरे व इतर शेतकरी बांधव उपस्थित होते.

# अमरावती पालकमंत्री ना.चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते हाफ मॅरेथॉन स्पर्धेच्या वेब साईट व प्रोमोचे उद्घाटन

## २५ डिसेंबर रोजी गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व अमरावती जिल्हा अथलेटिक्स संघटनाचे आयोजन




**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

भारताचे माजी प्रधानमंत्री भारतरत्न स्वर्गवासी अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्याने गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व अमरावती जिल्हा थलेटिक्स संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने २५ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी सहा वाजता राज्यस्तरीय हा मॅरेथॉन अटल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन स्पर्धेचे वेबसाईट व प्रोमोचे उद्घाटन अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री श्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते व आ प्रवीण भाऊ पोटे ,आयोजक भाजप नेते तुषारजी भारतीय यांच्या प्रमुख उपस्थिती सोबतच भाजप पदाधिकारी , कार्यकर्ते सह क्रीडा प्रेमी उपस्थितीत होते.

# कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या संपामुळे यंत्रणा ठप्प

**दि. २४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :** गेल्या तीस दिवसांपासून राष्ट्रीय आरोग्य मिशन (एनएचएम) अंतर्गत कंत्राटी डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांचा संप सुरू असल्याने आरोग्य यंत्रणेवरील ताण वाढला आहे. रुग्णांची गैरसोय होऊ नये, यासाठी स्थायी स्वरूपातील आरोग्य कर्मचारी कार्यरत असले, तरी त्यांची संख्या तोकडी असल्याने रुग्णांचे हाल होत आहेत.

शासकीय सेवेत सामावून घेण्यासह इतरही मागण्यांसाठी आरोग्य कर्मचाऱ्यांनी गेल्या २५ ऑक्टोबरपासून संप पुकारला आहे. शासनाने अद्याप त्यांची दखल घेतली नसल्याने हे आंदोलन पुढेही सुरू राहणार असल्याचे चित्र आहे. सरकारने अजूनही आंदोलनाची दखल न घेतल्याने संपकर्त्या कर्मचाऱ्यांमधून रोष व्यक्त होत आहे. परंतु जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, ग्रामीण भागातील रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढली असल्याने त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून स्थायी स्वरूपातील कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली. त्यामुळे त्यांच्यावरही कामाचा ताण प्रचंड वाढला आहे. अनेकांच्या सुट्याही रद्द करण्यात आल्या आहे. जवळपास २३ प्रकारच्या आरोग्य सेवांवर या संपामुळे परिणाम झाला आहे. यामध्ये प्रामुख्याने बालकांचे लसीकरण रखडले असून, ग्रामीण भागासह महापालिकेच्या दवाखान्यांमध्ये दर आठवड्यात नियोजित लसीकरण शिबिरांवरही परिणाम झाला आहे.

# राष्ट्रवादीच्या (शरद पवार गट) श्रेयवादाचा डाव भाजपने उधळला

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

विद्यापीठातील सभागृह लोकार्पनावेळी राष्ट्रवादी काँग्रेसने (शरद पवार गट) विद्यापीठ स्वतःच मालकीचे समजत सभागृहाच्या नाम फलकावरून भाजपचे जिल्हाध्यक्ष, राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे व सिनेट सदस्य तथा आमदार प्रताप अडसड यांचे नाव वगळल्याने भाजपच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक होत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चा श्रेयावादाचा डाव उधळून लावला. शासन नियमानुसार राजशिष्टाचार न पाळता अशा प्रकारचे कृत्य हे नियमबाह्य आहे. त्यामुळे असा अपमान भाजप कधीही खपवून घेणार नसल्याची माहिती युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अजिंक्य वानखडे यांनी दिल्याचे प्रसिद्धीप्रमुख ऋषिकेश इंगळे-पाटील यांनी कळविले आहे.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहाचे चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते



आज लोकार्पण करण्यात आले.या नाम फलकावरून राज्यसभेचे खासदार डॉ.अनिल बोंडे व राज्यपाल नामित सिनेट सदस्य आमदार प्रताप अडसड यांचे नाव वगळण्यात आले. यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हर्षवर्धन देशमुख यांचे नाव त्यावर प्रामुख्याने घेतल्याने भाजपा चांगलीच आक्रमक होत कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांच्या निलंबनाची मागणी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस धार्जिन्या कुलसचिव डॉ.तुषार देशमुख यांना विद्यापीठ सेवेतून तातडीने बडतर्फ करावे, अशी मागणी भारतीय जनता पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच सदर फलक तातडीने काढून त्याठिकाणी सुधारित फलक लावण्यात यावे अन्यथा सदर फलकाला युवा मोर्चा काळे फासल्याशिवाय राहणार नाही असा इशारा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अजिंक्य वानखडे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांना दिल्याची माहिती प्रसिधीप्रमुख ऋषिकेश इंगळे पाटील यांनी दिली आहे. राजशिष्टाचार न पाळता अशा पद्धतीने कार्यक्रम होत असेल तर आमच्या नेत्यांचा अपमान खपवून घेतला जाणार नाही. डॉ. पंजाबराव देशमुख यांना हायजॅक करण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी काँग्रेसने चालवला आहे. तोही भाजपाने हाणून पाडल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# इर्विन, डफरीन व सुपर हॉस्पिटलच्या रुग्णांसाठी होणार धर्मशाळाची उभारणी

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ.सौ. सुलभाताई खोडके यांची मागणी मान्य

**दि२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अमरावती शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालय,जिल्हा स्त्री रुग्णालय तसेच विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथे दाखल होणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी निवारा म्हणून धर्मशाळा बांधण्याची नितांत गरज आहे. जिल्हा नियोजनाच्या नाविन्यपूर्ण योजनेतून धर्मशाळा उभारण्या संदर्भात अमरावतीच्या आमदार सौ . सुलभाताई संजय खोडके यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये मुद्दा उपस्थित केला असता जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष तथा जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय चंद्रकांतदादा पाटील यांनी धर्मशाळा उभारणी संदर्भात मागणी मान्य करीत या संदर्भातील तरतूद व नियोजन करण्यासंदर्भात नियोजन विभागाला सूचना केली .अमरावती जिल्हाधिकारी कार्यालय स्थित नियोजन भवन सभागृहात शुक्रवार दिनांक २४ नोव्हेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्य मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री-नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची आढावा बैठक पार पडली.जिल्हा नियोजनाच्या बैठकीमध्ये आ.सौ . सुलभाताई खोडके यांनी अमरावती शहर विकास , आरोग्य , महिला व बाल



विकास , पायाभूत सुविधा तसेच शहर सुरक्षेच्या अनुषंगाने दिलेल्या महत्वपूर्ण प्रस्तावांवर चर्चा करून अध्यक्ष महोदय ना. चंद्रकांत पाटील यांना अवगत केले.जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत बोलतांना आ. सौ .सुलभाताई खोडके यांनी सांगितले की ,अमरावती शहराच्या विकासासाठी जिल्हा नियोजन मधून १२ कोटी रुपये निधी मिळत होता . शहराचा वाढता विस्तार व लोकसंख्या लक्षात घेता विकासाचे नियोजन करतांना हा निधी अत्यंत कमी पडत होता . तसेच शासनाकडून इतर कोणताही निधी मिळत नाही , त्यामुळे अमरावती महापालिका क्षेत्रासाठी जिल्हा नियोजनाच्या आराखड्यात ५० कोटी निधी प्रस्तावित केला आहे. या संदर्भात मागील दोन- तीन जिल्हा नियोजन बैठकीत मागणी करण्यात आली आहे. याला मान्यता प्रदान करण्यात यावी अशी मागणी आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आली. तसेच अमरावती शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय,तसेच विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथे ग्रामीण भागाबरोबरच धारणी , मेळघाट व मध्यप्रदेशाच्या सीमाभागातून रुग्ण उपचारासाठी दाखल होतात . त्यासोबत त्यांचे नातेवाईक सुद्धा येत असतात , मात्र त्यांना निवाऱ्याची सोय नसल्याने रुग्णालय परिसरातच त्यांना नाईलाजास्तव थांबावं लागते . सदर गैरसोय लक्षात घेता रुग्णालय परिसरात धर्मशाळा बांधण्यात यावी अशी मागणी आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली. यावर समितीचे अध्यक्ष पालकमंत्री नामदार चंद्रकांत दादा पाटील यांनी सदर मागणी मान्य करण्याबाबतची घोषणा केली .

तसेच शहरी भागात महावितरण च्या कामांसंदर्भात जिल्हा नियोजन समिती मार्फत साधारणतः १ ते १.५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. वाढते शहरीकरण व विस्तार पाहता या निधीतून ऊर्जा विभागाशी संबंधित देखभाल व दुरुस्तीची कामे करणे कठीण वाटत आहे. अनेक नागरिकांच्या घरावरून जुने वीज वाहिन्या गेल्या असून काही भागात विद्युत तारा या लोंबकळलेल्या अवस्थेत आहे. त्यामुळे कुठलाही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता लक्षात घेता महावितरण संदर्भातील देखभाल व दुरुस्तीच्या कामांकरिता जिल्हा नियोजनातून साधारणतः ७ कोटी रुपयांची तरतुद करण्यात यावी , याबाबत डीपीसी कडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून तो मान्य करण्यात यावा अशी मागणी आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आली . यावर सुद्धा कमीतकमी ५० टक्के निधी वाढवून देण्यासंदर्भात नियोजन करण्यासंदर्भात अध्यक्षमहोदयांच्या वतीने आश्वस्त करण्यात आले.त्याचबरोबर व्हिएमव्ही परिसर मार्ग लगतच्या सौरभ कॉलनी टॉवर लाईन ते वलगाव रोड दरम्यान यापूर्वी नाविन्यपूर्ण योजनेतून करण्यात आलेले उद्यान विकास कामे सद्यस्थितीत निधी अभावी रखडली आहेत. यासाठी डीपीसीतून निधी मिळण्यासंदर्भात प्रस्ताव देण्यात आला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय ते रेवसा पर्यंत भर वस्तीतून प्रवाहित होणाऱ्या नाल्यावर संरक्षण भिंत बांधकाम करण्यासाठीचा प्रस्ताव देण्यात आला आहे. शहरी भागात सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबत सुद्धा प्रस्ताव देण्यात आला आहे. याबाबत मागील बैठकांमध्ये चर्चा करण्यात आली असून हे सुद्धा त्वरित मार्गी लावण्याबाबत आमदार महोदयांनी मागणी केली .

### शहरालगतच्या वनक्षेत्र परिसराला संरक्षण भिंत

मागील काही महिन्यांपासून अमरावती शहरामध्ये सारखा बिबट्याचा संचार वाढत आहे. शहराच्या सीमा लगत असलेल्या जंगल वन परीक्षेत्रातुन बिबटया शहरात येतो. त्यामुळे नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. अनेक भागात रानटी प्राणी रस्त्यावर आडवे आल्याने अपघात झाल्याचे सुद्धा समोर आले आहे. नागरिकांच्या सुरक्षेबरोबरच वन्यजीवांचे रक्षणही महत्वाचे आहे. त्यामुळे वन्यजीव व मानव असा संघर्ष निर्माण होऊ नये म्हूुन अमरावती शहराला लागून असलेल्या जंगल भागाला संरक्षण भिंत बांधण्यात यावी, चैनलिंग फेंसिंग करण्यात यावे. यासाठीचे नियोजन करण्याबाबत आ. सौं. सुलभाताई खोडके यांनी सूचना केली. यावर सर्वेक्षण करून उपाय योजना करण्याची सूचना आढावा बैठकीदरम्यान पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली.

# संतनगरी शेगावात अवतरली पंढरी!

## ‘श्रीं’च्या पालखीची मंदिर परिक्रमा; कार्तिकीनिमित्त लाखावर भाविकांनी घेतले दर्शन



**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक बुलढाणा**

लाखावर भाविकांची मांदियाळी, विठुमाऊली व गजानन महाराजांचा जयघोष, टाळ मृदुंगाच्या तालामुळे दुमदुमनारा मंदिर परिसर आणि श्रींचा पालखी सोहळा, यामुळे संतनगरी शेगाव येथे आज, गुरुवारी पंढरी अवतरल्याचे चित्र होते.

संत नगरी शेगावात लाखावर भाविकांच्या उपस्थितीत गुरुवारी कार्तिक एकादशीचा सोहळा उत्साहात पार पडला. संध्याकाळी कार्तिक एकादशीनिमित्त श्रींच्या पालखीची मंदिर परिक्रमा काढण्यात आली. भाविकांनी श्रींच्या रजत मुखवट्याचे दर्शन घेतले.

सकाळी ४ वाजतापासूनच गजानन महाराज समाधी स्थळाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या. श्रींच्या समाधी मंदिर दर्शनासाठी ३ तास लागत होते तर श्रींच्या मुखदर्शनासाठी पाऊण तास लागत होता. संध्याकाळी ५ वाजता टाळ, मृदंगाच्या निनादात व हरिनामाच्या गजरात श्रींची पालखी मंदिर परिक्रमेसाठी मार्गस्थ झाली. टाळकरी, पताकाधारी वारकऱ्यांचा सहभाग पालखी सोबत होता. संस्थानच्यावतीने श्रींच्या रजत मुखवट्याचे ब्रह्मवृंदाच्या मंत्रोच्चारात पारंपरिक पद्धतीने पूजन करण्यात आले. त्यानंतर श्री विठ्ठलाच्या तैलचित्राचे पूजन करण्यात आले. सूर्य मावळतीला जात असताना पालखी मंदिरात दाखल झाली. श्रींच्या पालखीचीही आरती करण्यात आली.

# जिल्हा न्यायालयातही ‘व्हिडीओ कॉन्फरन्सिंग’ची व्यवस्था, राज्य शासनाने दिले एक कोटी

**दि.२४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयातील ‘डिजिटलायझेशन’ची प्रक्रिया वेगवान केल्यावर आता राज्यातील जिल्हा आणि तालुका न्यायालयांनाही अद्यावत करण्यात येत आहे. जिल्हा व तालुका न्यायालयात ‘व्हिडीओ कॉन्फरन्सिंग’ची व्यवस्था करण्यात येणार आहे.

राज्यात यासाठी पाचशे



सॉफ्टवेअर लायसेंस खरेदी करण्यात येतील. राज्य शासनाच्यावतीने यासाठी एक कोटी रुपयाचा निधी मंजूर केला आहे. राज्याच्या विधी आणि न्याय विभागामार्फत याबाबतचे परिपत्रक जाहीर करण्यात आले. ई-कोर्ट प्रकल्पाच्या अंतर्गत मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील जिल्हा न्यायालयांमध्ये व्हिडीओ कॉन्फरन्सिंगची सुविधा देण्यासाठी राज्य शासनाला प्रस्ताव सादर केला होता. विधी आणि न्याय विभागाच्या २० ऑक्टोबरला झालेल्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी प्रदान करण्यात आली. राज्य शासनाच्यावतीने एक कोटी दोन लाख ६६ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

# सणासुदीच्या दिवसांत एसटीला ६ कोटींचे उत्पन्न

**दि. २४ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती:**

सणासुदीच्या काळात अमरावती जिल्ह्यातील विविध आगारांतून एसटीच्या प्रवासाला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून दैनंदिन उत्पन्नात सुमारे दीडपट वाढ झाली आहे. एसटी महामंडळाने जिल्ह्यात ११ ते २० नोव्हेंबर या कालावधीत ६ कोटी ८ लाख ९१ हजार रुपये इतके उत्पन्न मिळवले आहे.

अमरावती जिल्ह्यात अमरावती, बडनेरा, परतवाडा, वरूड, चांदूर रेल्वे, दर्यापूर, मोर्शी आणि चांदूर बाजार असे एसटी महामंडळाचे आठ आगार आहेत. या आगारातजून ग्रामीण, शहरी व इतर लांब व मध्यम पल्ल्याच्या गाड्या सोडल्या जातात. यातून मोठ्या संख्येने प्रवासी प्रवास करतात. शहराचे वाढते नागरीकरण यासोबतच आता एसटी महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. तर दुसरीकडे, एसटी महामंडळाने महिला प्रवाशांसाठी तिकिटांमध्ये सवलत लागू केल्याने एसटीने प्रवास करणाऱ्या महिलांची संख्या वाढली आहे. विशेषत: दिवाळीच्या सुट्ट्या आणि सणासुदीच्या काळात गावी जाण्यासाठी व इतर ठिकाणी फिरायला जाण्यासाठी एसटीला प्राधान्य दिले जाऊ लागले आहे.

दरवर्षी दिवाळीत प्रवाशांची पुणे, नाशिक, औरंगाबाद आदी ठिकाणी प्रवाशांची अधिक ये-जा असते त्यामुळे खासगी ट्रॅव्हल्स कडून प्रवाशांना सुविधा देत अव्वाच्यासव्वा प्रवास भाडे आकारले जाते. परंतु याच स्पर्धेत आता एसटी महामंडळाने उडी घेत प्रवाशांना कमी भाडेदारात प्रवासाचा आनंद घेता यावा याकरीता जिल्ह्यात एसटी महामंडळाने सेवा पुरवली.

आठ बसस्थानकावरून अतिरिक्त बसेस सोडण्यात आल्या होत्या. दिवाळीपुर्वी सुमारे ४० तर दिवाळीनंतर ६० बसेसचे नियोजन देखील एसटी महामंडळाने केले. यामध्ये साध्या बसेससह निमआराम, शिवशाही आणि आठ स्लीपर बसेसचा देखील समावेश होता. त्यामुळे एसटी महामंडळाने आठही बसस्थानकातून बसेस सोडल्या. याशिवाय महिलांना व ज्येष्ठ नागरिकांना प्रवासात ५० टक्के सुट, अमृत ज्येष्ठ नागरिकांना निःशुल्क प्रवासाची देखील सुविधा या दरम्यान करण्यात आली. एसटी महामंडळाला या दिवाळीत ६ कोटी रूपयांचे उत्पन्न झाले. यामध्ये परतवाडा आगारातून सर्वाधिक १ कोटी ४७ हजार ४६९ तर दुसऱ्या क्रमाकांवर अमरावती बसस्थानकावरून ९६ लाख ८७ हजार ३९९ रूपयांची कमाई केली आहे.